# अर्थबोधपत्रिका

## आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा 'अर्थ'बोध करून देणारे मासिक

LIBRARY ★ INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ★
27/10/05

३ ● शिदोरी
५ ● बहुविधसंस्कृतीवाद
९ ● बदलता इस्लाम
१४ ● चकाकत्या सोन्यामागे....
१९ ● 'लवचिक' दृष्टी
२२ ● ....आणि १८८३ मध्ये लंडन हादरले तेव्हा....
२६ ● विश्वरुपदर्शन उच्च शिक्षणाचे
३१ ● बालकामगारांच्या विश्वात
३८ ● जिकडे-तिकडे :-
(व्हिडिओ गेम्सचा भूलभुलैय्या)
४० ● 'काल'चे 'आज'साठी
(म्हणोनि कथिली ग्रामगीता)

खंड ४ : अंक ८ नोव्हेंबर २००५

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**वार्षिक वर्गणी १००/- रुपये**

**(परदेशस्थ वाचकांसाठी $२०)**

वर्गणी डिमांड ड्राफ्ट/ मनीऑर्डर/ पोस्टल ऑर्डर/चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी'** या नावे पाठवावी. त्याबरोबर **नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा.**

---


**वर्गणीसाठी पत्ता :**

व्यवस्थापक,

**अर्थबोधपत्रिका,**

**भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी,** अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटलजवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : २५६५७१३२

: २५६५७२१०

फॅक्स : २५६५७६९७

ई-मेल : ispe@vsnl.com


---


**अर्थबोधपत्रिका**

**खंड ४ (अंक ८) नोव्हेंबर २००५**

**संपादक - अभय टिळक**

**साहाय्यक संपादक - राज्यश्री क्षीरसागर**


◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संपादकांच्या नावे संस्थेच्या पत्त्यावर पाठवावेत, अशी आपणास विनंती आहे.

## 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी?

## जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे 'अर्थबोधपत्रिका' हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेखन देणारे प्रकाशन **वर्गणीदारांना दरमहा १० तारखेला पोस्टाने पाठविले जाते.** ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्दिष्ट. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆ अंकातील लेख आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला अवश्य पाठवावा.

**जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे किती तरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे. - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी.**

# शिदोरी

'अर्थबोधपत्रिका' हातात पडेपर्यंत दीपावली उलटून गेलेली असली तरी पत्रिकेच्या कुटुंबातील सगळ्याच लहानथोरांना दीपावली आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा. तसे पाहिले तर सणासुदीचा सुकाळ असणाऱ्या संस्कृतीत एखाद्याच सणाची अपूर्वाई आवर्जून वाटण्याचे खरे म्हणता काही कारण नाही. मात्र, दिवाळीचे तसे नाही. आमच्या पारंपरिक कृषिप्रधान जीवनशैलीशी एवढा एकरूप झालेला, सर्वसामान्यांच्या घरा-मनांची अंगणे लक्ष लक्ष पणत्यांच्या स्निग्ध प्रकाशाने उजळून टाकणारा दीपावलीपरता दुसरा सण नाही. दिवाळीच्या आगमनाच्या आनंदाला मखर असते ते तुडुंब भरलेल्या कणग्यांची हमी देणाऱ्या लडिवाळ पावसाच्या आठवणींचे. यंदाचा पाऊस मात्र अक्राळविक्राळ होता. त्याच्या झडीची माया आश्वासक वाटण्याऐवजी पाचावर धारण बसविणारी ठरली. त्या तडाख्यातून सुटल्यासारखे वाटते न वाटते तोच भयकारी भूकंपाचे भयासूर दर्शन झाले. या सगळ्या घटना पाठीवर घेऊन यंदाची दिवाळी आली आणि जिभेवर मागे रेंगाळणाऱ्या करंजीच्या गोडीपेक्षाही चकलीच्या काटेरी टोकदारपणाचीच सय अधिक गडद राहावी, असेच काहीसे झाले खरे. पण शेवटी पणतीतील ज्योतीवर जमणारी काजळी केव्हा ना केव्हा झटकूनच टाकायची असते. तिच्यामधून स्त्रवणारा प्रकाश महत्त्वाचा. त्याच्याच साथीने तर वाटचाल चालू ठेवायची. संस्कृतीचा प्रवाह या न्यायानेच अक्षुण्ण वाहत असतो. या प्रवाहास चहू दिशांनी वाहणारे ओहोळ येऊन मिळतात आणि तो प्रवाह बहुढंगी, बहुरंगी असा बहुविध बनतो. मात्र, ही बहुविधता स्वीकारणे आणि त्याही पुढे जाऊन ती पचविणे, हे एक आव्हानच असते. जागतिकीकरणाच्या झपाट्यात लपेटल्या जाणाऱ्या आजच्या जगासमोर नेमके तेच आव्हान उभे ठाकत आहे. त्याला सामोरे जात असताना ठायी ठायी जी तारांबळ उडताना दिसते तिचे काही पैलू पुढील पानांत मांडले आहेत. संस्कृतीचा प्रत्येक नवीन ओहोळ सोबत एक नवीन विचारविश्व घेऊन येत असतो. अशा नवविचारांचे स्वागत करण्याचीच परंपरा 'अर्थबोधपत्रिके'ने जपली आहे. विचारांच्या जगात मुलुखगिरी करायची ती विचारांचीच शिदोरी बरोबर घेऊन. हाच तर खरा फराळ !

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'च्या ऑक्टोबर २००५च्या अंकातील 'हवे सबलीकरण विद्यापीठीय शिक्षणाचे', '...मग शेतीचे नवतंत्र शेतकऱ्यांना शिकविते तरी कोण?' 'बदलते स्त्रीजग'मधील 'विस्तारलेले अवकाश..' आणि 'हानिकारक सौंदर्यप्रसाधने' हे लेख वाचल्यावर मनात उमटलेले विचार पुढे मांडले आहेत - (१) व्यावसायिक अभ्यासक्रमांची निवड करावी, असे पालकच मुलांना सांगतात कारण नोकरी मिळाली नाही तरी व्यवसायातून अर्थप्राप्ती होऊ शकते. तेव्हा घेतलेल्या शिक्षणानंतर निश्चित अर्थप्राप्ती होऊ शकणार असेल तर आपल्या आवडीच्या क्षेत्राचे शिक्षण मुले निश्चितच घेतील. शिक्षण प्रक्रियेत प्रात्यक्षिकावर अधिक भर असावा, त्यामुळे विषयाबाबत आवड निर्माण होईल. (२) आंतरविद्याशाखीय शिक्षणप्रणालीस चालना देणे निश्चितच आवश्यक आहे. आयुर्वेद आणि समाजशास्त्र, आयुर्वेद आणि मानसशास्त्र आयुर्वेद आणि भौतिकशास्त्र अशा आंतरविद्याशाखीय दृष्टीने अभ्यासक्रमांची रचना होणे आवश्यक आहे. (३) पदव्युत्तर तसेच डॉक्टरेटच्या पदवीसाठी आयुर्वेदाच्या क्षेत्रात केल्या जाणाऱ्या अध्ययन-संशोधनाचा संख्यात्मक विस्तार होतो आहे. (४) औषधी वनस्पतींच्या लागवडीसंबंधी प्रत्यक्ष शेतात जाऊन व प्रशिक्षण शिबिरात सांगूनदेखील शेतकरी त्यांची लागवड करीत नाहीत कारण त्याद्वारे आर्थिक लाभ निश्चितपणे होईल याचा त्यांना विश्वास वाटत नाही. ग्रामसेवक, आकाशवाणी, दूरदर्शन, वृत्तपत्रे ही माध्यमे शेतकऱ्यांपर्यंत याबाबत माहिती पोचवित नाहीत वा ती तशी पोचली तरी पुरेशा शिक्षणाअभावी बहुसंख्यांना तिचा व्यवहारात उपयोग होत नाही. आयुर्वेद हा शेतीशास्त्रास जवळचा आहे. त्यामुळे शेतीच्या अभ्यासक्रमात औषधी वनस्पतींची लागवड, त्यांचे दर्जेदार उत्पादन, त्यातून मिळणारे उत्पन्न यासंबंधीची माहिती समाविष्ट होणे आवश्यक आहे. (५) घराबाहेर फारसे न पडताही करता येण्यासारखे व्यवसाय निवडल्यास शिक्षणाचा उपयोग होण्याबरोबरच स्त्रियांना घरासाठीही वेळ देता येईल. (६) औषधी वनस्पतींपासून बनविलेली सौंदर्यप्रसाधने वापरणे अधिक हितकारक आहे. **डॉ. शशिकांत म. साठ्ये, पुणे**

मध्यंतरी 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक वाचण्यात आला. हा विशेषांक अतिशय सुंदर, वाचनीय व संग्रहणीय आहे. **शाम मलकलवार, चंद्रपूर**

# बहुविधसंस्कृतीवाद

अलीकडे, युरोपीय देशांमध्ये मुस्लिमधर्मियांच्या संदर्भात, बहुविधसंस्कृती हा विषय गांभिर्याने चर्चिला जातो आहे. विशेषतः, लंडन येथील बॉंबस्फोटानंतर या विषयाला आणखीनच महत्त्व मिळाल्याचे आढळते. या संदर्भात, ब्रिटनमधील 'कमिशन फॉर रेशियल इक्वालिटी'चे अध्यक्ष ट्रेव्होर फिलिप्स यांनी, 'बहुविधसंस्कृतींमुळे सांस्कृतिक भेद वाढतात; तसेच हे भेद जपण्यासाठी सामाजिक सलोख्याचा, सौहार्दाचा बळी दिला जातो, त्यामुळे हा विषय व्यवहार्य ठरत नाही,' असे मत मांडले आहे. तर वृत्तपत्र स्तंभलेखक यास्मिन अलीभाई ब्रॉउन यांनी, 'बहुविधसंस्कृती ही कल्पना मृत झाली असून ती काळाच्या इतिहासात लोप पावली असल्याचे मत मांडले आहे.' या दोन्ही विधानांवरून या चर्चेमागील गांभिर्य लक्षात येईल.

युरोपीय देशांमधील इतर धर्मियांची वाढलेली संख्या आणि दहशतवादी कारवाया या पार्श्वभूमीवर बहुविधसंस्कृती व त्या ओघाने येणारे राजकारण, समाजकारण हे विषय अनेकांच्या अभ्यासाचे ठरत आहेत. तारिक मोदूद या अभ्यासकाने 'मल्टिकल्चरल पॉलिटिक्स: रेसिझम, एथनिसिटी अँड मुस्लिम्स इन ब्रिटन' असे एक पुस्तक लिहिले असून 'एडिंबर्ग युनिव्हर्सिटी प्रेस'ने ते नुकतेच प्रसिद्ध केले आहे. तसेच मिकाएल केथ या अभ्यासकाने 'आफ्टर द कॉस्मोपोलिटन ?: मल्टिकल्चरल सिटीज अँड द फ्युचर ऑफ रेसिझम' हे पुस्तक लिहिले असून ते 'राउटलेज'ने प्रसिद्ध केले आहे. या दोन्ही पुस्तकांवरील परीक्षणवजा लेख झियाउद्दीन सरदार यांनी लिहिला आहे. त्या लेखाच्या आधारे ब्रिटनमधील 'बहुविधसंस्कृतीवाद' जाणून घेणे उद्बोधक ठरेल.

अलीकडच्या काळात, बहुविधसंस्कृती असलेल्या देशांमध्ये काही राजकीय/सामाजिक धक्के बसले असले तरी बहुविधसंस्कृतीवाद मोडीत काढण्यात येऊ नये, असे मत तारिक मोदूद यांनी मांडले आहे. या मताच्या पुष्ट्यर्थ ते ब्रिटनचाच दाखला देतात. बहुविधसंस्कृती मान्य केल्यानेच आजचा ब्रिटन पूर्वीच्या तुलनेत वंश-वर्णभेदवादी राहिलेला नाही. त्यामुळेच आफ्रिकनवंशियांना ब्रिटनमध्ये वेगाने प्रगती करता आली असून आशियातील सुशिक्षित मध्यमवर्गीय नागरिक ब्रिटनमध्ये विविध क्षेत्रांत काम

करू लागला आहे. ब्रिटनमधील समाजाचा चेहरा-मोहरा बदलण्यात या बाह्य संस्कृतीमधील घटकांचाही सहभाग आहे, असे त्यांना वाटते. ब्रिटिश-एशियन सिनेमा 'बेंड इट लाइक बेकहॅम' आणि टेलिव्हिजनवरील 'द कुमार्स ॲट नंबर फॉर्टी टू' या कार्यक्रमांद्वारे ब्रिटनच्या समाजजीवनाचे वेगळे चित्र देशविदेशात उभे राहिले आहे, असे ते म्हणतात. पण मोदूद यांनी असे गुलाबी चित्रच रंगविले आहे असे नाही; तर याची दुसरी बाजूही मांडली आहे. पूर्वीच्या वंश-वर्णभेदाची तीव्रता अलीकडे आढळत नसली तरी आजही 'ब्रिटिश-एशियन्स' यांना वेगळ्या प्रकारच्या वंश-वर्णभेदाला सामोरे जावे लागते. हा सांस्कृतिक वंश-वर्णभेद आहे, असे म्हणता येईल. भाषा, धर्म, कुटुंबपद्धती, पोशाख अशा काही बाबींवरून हा सांस्कृतिक वंश-वर्णभेद चर्चेत वा कृतीत डोकावतो. यावरूनच 'एशियन्स' कोण आहेत आणि 'ब्रिटिश एशियन्स' विशेषतः 'ब्रिटिश मुस्लिम्स' कोण आहेत, ते मागासलेले आहेत किंवा कसे, त्यांचे ब्रिटनमधील वास्तव्य सामाजिक व राजकीयदृष्ट्या मान्य केले जावे अथवा नाही, असे ठरत असते.

मोदूद यांच्या मते हे प्रश्न उद्‌भवले आहेत कारण, ब्रिटनने अमेरिकेकडून वंश-वर्णभेदाची - काळे व गोरे यांवर आधारित अशी - एक सोपी संकल्पना आयात केली. पण ब्रिटनमधील समाजाचे गुंतागुंतीचे प्रश्न या संकल्पनेद्वारे सुटले नाहीत. मग मोदूद यांचा तोडगा तरी काय ? त्यांच्या मते खुलेपणा वा उदारमतवाद हे याचे उत्तर नाही. कारण त्यातून वांशिकता, संस्कृती या वैयक्तिक निवडीच्या बाबी आहेत हे ध्वनित तर होते; पण वस्तुतः, हे निवडीचे स्वातंत्र्य त्यातून मिळत नाहीच. शिवाय त्यांच्या मते, या संदर्भात धर्मनिरपेक्षतेची संकल्पनाही आपल्याला दूर सारली पाहिजे. मग, खरी गरज कशाची आहे ? तर त्यांच्या मते आपापली 'वांशिकता' समाजापुढे आक्रमकतेने मांडण्याची. अल्पसंख्य समाजाला एक नागरिक म्हणून सर्व अधिकार मिळायला हवेत. आपले स्वातंत्र्य राखूनही त्यांना समाजात मिसळता आले पाहिजे. आपली सांस्कृतिक विविधता जोपासण्यासाठी त्यांना सार्वजनिक निधी जमवण्याची परवानगी व आपली शैक्षणिक व सांस्कृतिक धोरणे ठरविण्याचे अधिकार मिळाले पाहिजेत. तसेच अशा गटांना केवळ 'एशियन्स' म्हणून भागणार नाही तर त्यांच्यातील 'पाकिस्तानी', 'बांगलादेशी', 'सिंधी पाकिस्तानी', 'मीरपूरी पाकिस्तानी' अशा प्रकारचे गट व त्यांची विविधताही लक्षात घेतली पाहिजे, असे मोदूद स्पष्ट करतात.

मोदूद यांचा 'वांशिकते'वर असलेला भर हा अडचणीचा ठरू शकतो. मुळात, 'वांशिकता' हा शब्दच अमेरिकेकडून उचलण्यात आला आहे. अमेरिकेत युरोपीय

नागरिकांना वगळून इतर सर्वांसाठीच 'वांशिक' असा शब्दप्रयोग करण्यात येतो. त्यामुळे 'वांशिकता' स्पष्ट करण्यापेक्षा जे 'वांशिक नाहीत ते,' या स्पष्टीकरणाकडे हा शब्द झुकतो. एका अर्थाने, अमेरिकेत वंश-वर्णभेदाला हे सौम्य नाव दिले गेले आहे. अमेरिकेत युरोपीय नागरिकांना 'जर्मन-अमेरिकन', 'इटालियन-अमेरिकन', 'आयरिश-अमेरिकन' असे संबोधण्यात येते. त्यांच्यासाठी 'वांशिक' असा शब्दप्रयोग केला जात नाही. मात्र, युरोपीय समाज सोडला तर इतर सर्व, उदाहरणार्थ - 'चायनिज', 'एशियन' वा 'अफ्रिकन' यांच्यासाठी 'वांशिक' असाच शब्दप्रयोग केला जातो. 'वांशिक' असा शब्दप्रयोग करण्यात आला की त्या गटाच्या लोकांना सर्वप्रकारची कमी दर्जाची वागणूक मिळू शकते. हा शब्द मुळातच वंश-वर्णभेददर्शक आहे. तसेच या शब्दाला महत्त्व दिले गेले की मनामनांत विघटनाची बीजे रुजतात. विशिष्ट वंशाबद्दलचे विशेष प्रेम एखाद्याच्या मनात असले तर अनेक प्रकारचे प्रश्न निर्माण होत जातात. महत्त्वाचे म्हणजे काही नागरिकांच्या मनात अशी प्रखर वांशिक भावना नसेल तर, त्यांच्याकडूनही आपली ओळख वा वेगळेपण निर्माण करण्यासाठी काही प्रयत्न केले जातात. अशा प्रयत्नांमधून असमाधान वाढीला लागू शकते व सामाजिक स्थैर्य धोक्यात येऊ शकते. अमेरिकेत असे वेगळेपण जोपासण्याचे प्रयत्न सतत होत असताना दिसतात.

मोदूद यांनी वंश-वर्णभेदाची व सांस्कृतिक वंशभेदाची मांडलेली संकल्पना मुळातच चुकीची आहे असे झियाउद्दीन सरदार यांना वाटते. पाश्चात्य देशांमधील वंश-वर्णभेद हा नेहमीच सांस्कृतिक वंशभेद राहिलेला आहे, असे सांगून ते याची मुळे इतिहासातून स्पष्ट करतात. इतिहासात सेंट टॉमस ॲक्विनास यांनी 'नॅचरल लॉ'चे समर्थन केले होते. देवाने (येशू ख्रिस्त) सांगितलेल्या नियमांनुसारच सर्व गोष्टी करणे हेच बरोबर असते, अशा शब्दांत 'नॅचरल लॉ' मांडला गेला आहे. त्यामुळे ख्रिश्चनेतर नागरिकांचे दैनंदिन जीवन हे 'नॅचरल लॉ'च्या तत्वात बसते, असा विचार करणे कठीण जाते. नागरिकांचे दैनंदिन व्यवहार आणि त्यांच्या पूजाअर्चांच्या पद्धती यांचाच विचार यात आहे. मात्र, यात वर्णभेदाचा विचार नाही ही चांगली बाब मानली पाहिजे, असे झियाउद्दीन सरदार म्हणतात.

या नंतर गुलामगिरीच्या पद्धतीचे समर्थन करण्यासाठी वर्णभेदाचा मुद्दा पुढे आला. लॅटिन अमेरिकेतही याच काळात वर्णभेदाची सुरुवात झाली. अर्थात, वर्णभेदाचा मुद्दा चर्चेत आला असला तरी आचार-विचारांना महत्त्व देण्यात येत होतेच. झियाउद्दीन सरदार म्हणतात की, वंशभेद व सांस्कृतिक वंशभेद यात नेमका फरक करणे कठीण

आहे, हा मुद्दा लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. मोदूद यांच्या लिखाणातील आणखी एक त्रुटी म्हणजे जागतिकीकरण, बहुविधसंस्कृतीवाद आणि राजकारण यांतील संबंधांकडे त्यांचे लक्ष गेलेले दिसत नाही. मात्र यांचा विचार मिकाएल केथ यांनी केला आहे.

'आफ्टर द कॉस्मोपोलिटन' मध्ये मिकाएल केथ म्हणतात की, जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत, बदलत्या समाजजीवनात, एखादी व्यक्ती एकाच, न बदलणाऱ्या संस्कृतीला धरून ठेवेल, असे म्हणणे कितपत योग्य व व्यवहार्य ठरेल, ही विचार करण्याची बाब आहे. तसेच बहुविधसंस्कृतीच्या टीकाकारांनी या वस्तुस्थितीला सामोरे जाण्याची तयारीही ठेवली पाहिजे. जागतिकीकरण, आर्थिक उदारीकरण, शहरांचा विस्तार, लोकसंख्याशास्त्रीय अभ्यास आणि नागरिकांचे बदलते दैनंदिन जीवन इत्यादी बाबींचा विचार केला तर बहुविधसंस्कृती नाकारणे, ही अशक्य बाब आहे हे ध्यानात येते. किंबहुना, आर्थिक विकासाची, नवनवीन सुधारणांची, बदलांची आणि शहरांमधील गतिमान जीवनाची ती प्रेरणा आहे, असे दिसते. जागतिकीकरणामुळे घडून येणाऱ्या सर्व बदलांच्या माध्यमातून जग जणू काही एका मोठ्या शहराचे रूप धारण करीत आहे, असे दिसते. या पार्श्वभूमीवर बहुविधसंस्कृतीवादाचा विचार व्हायला हवा.

जागतिकीकरणामुळे एक नवीन असा बहुविधसंस्कृतीवाद आकाराला येत असून त्याची एक मोठी खूण म्हणजे वांशिकता आणि सांस्कृतिक भेद यांत अपरिहार्यपणे व सातत्याने काही बदल घडून येत आहेत ही होय. बहुविधसंस्कृतीवादाच्या जुन्या चौकटीतून या नवीन बहुविधसंस्कृतीवादाचे आकलन होणे कठीण आहे. म्हणून केथ यांच्या मते आपण 'स्थलांतरित' (इमिग्रंट) हा शब्द नव्याने जाणून घेण्याची गरज आहे. याचे कारण केथ स्पष्ट करतात की, १९९१ ते २००१ या काळात स्थलांतरितांमुळे लंडनची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. हे स्थलांतरित कॅनडा, अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका येथील आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय युद्धे अनुभवलेलेही काही येथे आहेत. नव्या बहुविधसंस्कृतीवादाद्वारे या स्थलांतरितांना नव्याने ओळख मिळवून देण्याची गरज निर्माण झाली आहे. या ओळखीतून त्यांचा अपमान होणार नाही उलट, त्यांना मान मिळेल असे घडायला हवे आहे. म्हणून हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा भाग आहे. चेचेन्या वा इराक येथे जे काही घडले त्याचे पडसाद लंडनच्या रस्त्यांवर उमटणे स्वाभाविक आहे. आता बहुविधसंस्कृतीवाद ब्रिटनला बदलतो आहे. झियाउद्दीन सरदार यांच्या मते, बहुविधसंस्कृतीवाद मृत झाला आहे वा बहुविधसंस्कृतीवाद चिरायू होवो, असा सध्याचा विरोधाभास आहे. *(संदर्भ - न्यू स्टेट्‌स्‌मन - १ ऑगस्ट २००५)*

सांस्कृतिक

# बदलता इस्लाम

इस्लाम धर्म हा जगातील काही प्रमुख धर्मांमधील एक मोठा धर्म मानला जातो. उत्तर आफ्रिकेपासून दक्षिणपूर्व आशियापर्यंत हा धर्म पसरलेला आहे. अरबस्तान हा इस्लाम धर्मांचा केंद्रबिंदू मानला गेला असला तरी बहुसंख्य मुस्लिम नागरिक आशिया व आफ्रिकेत वास्तव्य करून आहेत. इस्लाम धर्म मानणारे लाखो नागरिक आज युरोपमध्ये राहात आहेत. अनेक देशांमध्ये पसरलेल्या आणि मुळात शांततेसाठी स्थापन झालेल्या इस्लाम धर्मात आज एक प्रकारची अशांतता, अस्वस्थता आढळते. विशेषतः, इस्लामी अतिरेक्यांचा दहशतवाद हा सध्याच्या जागतिक राजकारणात महत्त्वाचे स्थान मिळविलेला विषय आहे. या दहशतवादामुळे हादरलेल्या देशांमध्ये इस्लामबद्दल विविधांगांनी अभ्यास करण्यात येत आहे. दहशतवादामुळे इस्लाम मूलतत्ववादाकडे झुकतो आहे, अशी चर्चा या संदर्भात चालू असतानाच दहशतवाद मान्य नसणारे इस्लामधर्मीय नागरिक आणि अभ्यासक इस्लामचे वेगळे रूपही समाजासमोर आणत आहेत. तर, इस्लाममध्ये काही बदल होण्याची गरज असल्याचे प्रतिपादनही काही अभ्यासक करीत आहेत. इस्लाममधील या मतप्रवाहांबाबत इस्लामधर्म केंद्रस्थानी असणाऱ्या पाकिस्तान, इंडोनेशिया, मलेशिया, मोरोक्को, टर्की इत्यादी राष्ट्रांमधील धोरणकर्त्या नेत्यांना, विचारवंतांना काय वाटते, याचा आढावा बी.बी.सी.तर्फे झियाउद्दीन सरदार यांनी अलीकडेच घेतला. त्यातून पुढे आलेल्या बदलत्या इस्लामचे हे शब्दचित्र.

'इस्लाम' शब्द उच्चारला की पहिले डोळ्यांपुढे येते ते विशिष्ट पोशाख घातलेल्या एखाद्या अरबाचे चित्र. पण वस्तुस्थिती अशी आहे की दर सहा मुस्लिम नागरिकांमागे फक्त एक नागरिक अरब आहे. 'इस्लाम' शब्दाबरोबर चटकन लक्षात येणारी दुसरी बाब म्हणजे मूलतत्ववाद आणि दहशतवाद. पण याही बाबतीत खरी परिस्थिती वेगळी आहे. मुस्लिम समाजात आज इस्लामबाबत बरीच चर्चा होत असून अनेकांना प्रगतीशील, सुधारित वा बदललेला इस्लाम हवा आहे. या संदर्भात एक

लक्षणीय बाब अशी की इस्लामचे रूपही देशादेशांप्रमाणे काही प्रमाणात बदलत गेले आहे. विशेषतः, दक्षिणपूर्व आशियातील मुस्लिम देश व समाज हे भाषा व संस्कृती यांचा विचार करता काही बाबतींत भिन्न आहेत.

**पाकिस्तान**

देशाच्या घटनेत, 'इस्लामिक राज्य' असा उल्लेख असणारा पाकिस्तान हा भारताचा सख्खा शेजारी असलेला देश. दहशतवादाचे अनेक धागेदोरे पाकिस्तानात सापडल्याने दहशतवादाइतकाच पाकिस्तान हा देशही अलीकडे चर्चेत आहे. पाकिस्तानचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांची मुलाखत घेण्यासाठी गेलेल्या बी.बी.सी.च्या चमूला कडक तपासणीतून जावे लागले. त्यांचे सेलफोन काढून घेतले गेले आणि त्या मुलाखतीचे चित्रीकरण करणाऱ्या चमूचेच चित्रीकरण सरकारी यंत्रणेतर्फे 'कार्यालयीन नोंद' म्हणून करण्यात आले.

दहशतवादाला पाठिंबा देणारा देश असा पाकिस्तानचा उल्लेख होत असला तरी मुशर्रफ यांनी पाकिस्तान दहशतवादाचा मुकाबला 'विवेकी नेमस्तपणा' (enlightened moderation) या मार्गाने करीत असल्याची भूमिका मांडली. त्यांच्या मते ही दुहेरी योजना आहे. एक म्हणजे दहशतवाद फेटाळून लावणे आणि दुसरे म्हणजे धार्मिक नेमस्तपणा स्वीकारून सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणणे. पाकिस्तानने दहशतवादाचा मार्ग स्वीकारला तर त्याचे भवितव्य अंधारलेले असेल, असा काळजीचा सूर त्यांच्या बोलण्यातून उमटला. पण पश्चिमेकडील काही देशांना वाटते तेवढे मुशर्रफ यांचे हात बळकट नाहीत. असे बदल घडवून आणण्याची शक्ती वा अधिकार हे त्यांच्याकडे मुळातच मर्यादित आहेत. मुशर्रफ यांनी 'विवेकी नेमस्तपणा' हे दोन शब्द फार काळजीपूर्वक वापरले आहेत, तेही विशेषेकरून 'जमात-ए-इस्लामी' या जहाल इस्लामिक पक्षाच्या संदर्भात (पाकिस्तानच्या राजकारणात हा पक्ष काही जागा मिळवू लागला आहे, ही काळजीची बाब आहे). या पक्षाचे नेते काझी हुसैन अहमद यांना मात्र इस्लामिक विचारधारेत काही चूक आहे असे वाटत नाही. पाकिस्तानात 'शरिया'ला कायदेशीर मान्यता असून 'शरिया' हा देशाच्या कारभाराचा पाया असला पाहिजे, असे त्यांचे ठाम मत आहे.

पाकिस्तानमधील अनेक नागरिक मात्र शरियाच्या विरोधात आहेत. शरिया अन्यायकारक आहे, असे त्यांना वाटते. तसेच, इस्लामिक पक्ष व लष्करी राजवट या दोहोंबद्दल त्यांच्या मनात तीव्र नाराजी आहे. ही नाराजी व्यक्त करण्यात अनेक महिला

आघाडीवर आहेत. संगीत, कला, फॅशन या अत्याधुनिक गोष्टी त्यांना हव्या आहेत. पाकिस्तान हे राष्ट्र जगासमोर आव्हान उभे करत असेल तर ते आव्हान तेथील नागरिकांकडून नाही किंवा काझी वा त्यांच्या पक्षाकडूनही नाही. 'अदृष्य असा लष्करी गणवेषधारी हात' ही तेथील खरी डोकेदुखी आहे आणि पश्चिमेकडील राष्ट्रांना हा 'लष्करी हात' दिसून येऊ शकत नाही. मुशर्रफ यांचे प्रसिद्धिप्रमुख जनरल सुलतान यांनी या मुलाखतीदरम्यान टिपणे काढली. मुलाखत संपल्यानंतर संबंधितांबरोबर बसून ती आपल्या पद्धतीने 'एडिट' करून घेतली. लष्कराचे सर्वत्र असणारे नियंत्रण, ही खरी त्रासदायक गोष्ट म्हटली पाहिजे. तालिबान राजवटीची निर्मिती, जिहादी मदरशांना आश्रय आणि धार्मिक मूलतत्ववाद यांना खतपाणी ही कामे या 'अदृष्य हाता'च्या मदतीने कशी होतात, हे समजणे खरोखरच अवघड आहे. माजी लष्करप्रमुख झिया उल हक यांनी 'शरिया'ला महत्त्व दिले. त्यामुळे पाकिस्तानची लष्करी राजवट इस्लाममध्ये काही बदल घडवून आणेल, या भ्रमात कोणी राहू नये. असे असले तरी एक लक्षवेधक व आशादायक बाब अशी की, इस्लाममध्ये बदल घडवून आणण्याच्या दृष्टीने काही विचारविनिमय मंदगतीने का होईना, पण चालू आहे.

**इंडोनेशिया**

लष्कराच्या कचाट्यातून सुटण्यासाठी पाकिस्तान धडपडत असला तरी इंडोनेशिया या मुस्लिम राष्ट्राने मात्र लष्करी राजवटीची कास केव्हाच सोडली आहे. लोकशाहीचा प्रभाव येथे लगेच जाणवतो. अब्शर अब्दला हे 'लिबरल इस्लाम नेटवर्क'चे संस्थापक. तरुण गटातील हा नेता धर्माचा अभ्यासक आहे. माणसाला विचार करण्याचे, प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य हवे, असे त्याचे मत आहे. इंडोनेशियाला बुद्धिवादी वादचर्चेची, राजकीय मतभेदांची सवय आहे. लोकशाहीमुळे तर याला आणखी महत्त्व आले आहे. या सर्वांचे फलित म्हणजे इस्लाम आणि शासन यांच्यातील संबंध बदलले आहेत. इस्लामच्या परंपरेप्रमाणे शरियावर आधारित कायदेयंत्रणेला महत्त्व होते. पण आता राजकीय इस्लामच्या मदतीने नागरी समाजाची बांधणी नव्याने करण्यात येत आहे. 'मुहम्मदियां या संस्थेचे युवा नेते अब्दुल मुक्ती यांच्या मते 'शरियाशिवाय इस्लाम'चा विचार करण्याची वेळ आलेली आहे.

इंडोनेशियातील मुस्लिम समाजात जेवढा उदारमतवाद आढळतो तेवढा इतर देशांमध्ये आढळत नाही. नवा काळ लक्षात घेऊन कुराणातील पंक्तींचा नव्याने अर्थ लावून इस्लाम मानणारे विचारवंत या देशात आहेत. धर्म व शासन या दोन वेगवेगळ्या

बाबी आहेत, असेही तेथे मानले जात आहे. मुख्य म्हणजे दूरचित्रवाणीवरून तेथे बौद्धिक कार्यक्रम सादरही करण्यात येत आहेत. मूलतत्ववादाला उतरती कळा लागली असून बहुसंख्य नागरिकांच्या पाठिंब्यावर सुधारणावाद्यांची आगेकूच चालू आहे.

**मलेशिया**

इंडोनेशिया तळागाळापासून बदलत आहे तर मलेशियातील बदल वरून खाली झिरपत आहेत. गेली २५ वर्षे महाथीर मोहम्मद यांच्या समर्थ नेतृत्वाखाली मलेशियाने विकासाचा मार्ग स्वीकारला. आता पंतप्रधान अब्दुला अहमद बदावी यांच्याकडे ही सूत्रे आली आहेत. इस्लामच्या भवितव्याबाबत त्यांनी काही चिंतन केले आहे. बदावींच्या शब्दांत त्याला 'इस्लाम हदहारी' असे म्हणता येईल. 'इस्लाम हदहारी'चा भर वर्तमान व भविष्यावर आहे, भूतकाळावर नव्हे. बदावी यांची आधुनिक इस्लामची कल्पना 'आर्थिक व सांस्कृतिक विकास आणि मोकळ्या मनाने आधुनिकतेचा स्वीकार' अशी आहे. आधुनिकतेच्या विरोधात असे काही इस्लाममध्ये नाही, असे स्पष्ट केलेल्या बदावी यांचा भर शहरांमधील सुधारणा व शहरांतील विकासाभिमुख जीवन यांवर आहे. याचे कारण उघडच आहे. ते असे की, मूलतत्ववादी इस्लामिक पक्ष हा काही विशिष्ट ग्रामीण भागापुरताच मर्यादित आहे.

इंडोनेशियाला मलेशियाप्रमाणे बुद्धिवादी चर्चेची परंपरा नाही. धर्मानुयायी किंवा नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे आचरण करण्याचा प्रघात येथे आहे. त्यामुळे बदावी यांनी आपल्या देशातील नागरिकांना सहिष्णू व आधुनिक व्हायला सांगितले तर ते तसे करतील. 'इस्लाम हदहारी' ही कल्पना चांगली असली तरी इस्लाममधील सुधारणांबाबत पाश्चात्य देशांच्या ज्या काही कल्पना आहेत, त्याच्याशी ती जुळणारी नाही. सध्या एवढेच म्हणता येते की, मलेशियातील घडामोडींचा अभ्यास सतत करत राहावा लागणार आहे.

**मोरोक्को**

नेत्यांनी सांगितले तर बंदिस्त समाजात वरून खाली अशा प्रकारे सुधारणा घडून येऊन शकतात. असे काहीसे मोरोक्कोमध्ये घडते आहे. राजे मोहम्मद (सहावे) यांनी शरियामध्ये बदल करण्याच्या दृष्टीने काही पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. सुधारणावादी नागरिक व स्त्रियांच्या दबावामुळे त्यांनी हे कार्य हाती घेतले असले तरी 'राजा बोले दळ हाले', अशी येथील परिस्थिती असते. राजाने 'बदल' म्हटले की धार्मिक नेत्यांनाही बदल स्वीकारावा लागतो. यामुळे १२०० वर्षांपूर्वीचा कौटुंबिक

कायदा बदलून स्त्रियांना, मुलांना व अल्पसंख्याकांना समान अधिकार देणारा कायदा तेथे करण्यात आला आहे. या राजाची व मुलाखतकाराची प्रत्यक्ष भेट होऊ शकली नाही. मात्र, या राजाच्या पाच सल्लागारांपैकी एका सल्लागाराबरोबर मुलाखतकाराची चर्चा झाली. आश्चर्य म्हणजे या ज्यू वंशीय सल्लागाराने नवीन सुधारणा, आपला वंश याबद्दल भरभरून माहिती दिली. मात्र मोरोक्कोमध्ये अद्याप राजेशाही आहे, या विषयावर त्याने मौन पाळणेच पसंत केले. सुधारणावादी स्त्रिया, धार्मिक अभ्यासक, कायदेतज्ज्ञ अशा अनेकांच्या चर्चांमधून नवीन कौटुंबिक कायदा सर्वदृष्टीने चांगला असल्याचे मत प्रकर्षाने पुढे आले. शरियामध्ये बदल करणे शक्य नाही असे म्हणणारे गप्प बसतील, अशा सुधारणा मोरोक्कोमध्ये घडून आल्याचा सार्थ अभिमान त्यांच्या बोलण्यातून पुढे आला. तरुण-तरुणी व ज्येष्ठ नागरिक असे सर्वच या सुधारणांवर खूष झाले आहेत.

**टर्की**

टर्कीचे पंतप्रधान रेकेप टय्यप इर्दोगन हे लोकशाहीचे समर्थन करतात. युरोपला कुठेही विरोध न करता ते, इस्लाममध्ये असलेल्या मानवतावादी परंपरा युरोपनेच कशा मान्य केल्या आहेत, हे स्पष्ट करतात. टर्कीच्या मित्र परिवारात युरोपचे असणे हे स्वाभाविकच आहे, तसेच आपला देश आधुनिक, सुधारणावादी आहे असेही त्यांना वाटते. सुधारणावादी, प्रगतीशील दृष्टिकोणातूनच देशाची अर्थव्यवस्था तेजीत आहे. राजकारणातील लष्कराचा सहभाग कमी होत आहे. आपल्या देशातील मुस्लिमच केवळ बदलत नाहीत तर ते देशाचे राजकारणही बदलत आहेत असे या पंतप्रधानांना वाटते. याच भूमिकेवरून आपल्या देशाचे इतर देशांशी संबंध जुळून येत आहेत, असे त्यांना वाटते. एकंदरीत पाहता या मुस्लिम देशांमध्ये काही सुधारणा नक्कीच होत आहेत. राजेशाही असलेल्या देशांची सुधारणांची उडी फारच मोठी आहे; तर, लोकशाही असलेल्या इंडोनेशियात सुधारणांवर चर्चा चालू आहे, असा थोडासा विरोधाभासही यातून जाणवतो. मुस्लिम देशांमध्ये सुधारणांचे वारे वाहत आहेत, ही नक्कीच समाधानाची बाब आहे. मात्र, प्रत्येक देशाप्रमाणे सुधारणांची गती वेगळी आहे तसाच बदलता इस्लामही वेगळाच आहे

*(संदर्भ - न्यू स्टेट्स्मन - ८ ऑगस्ट २००५, याच विषयावरील 'बॅटलिंग फॉर द सोल ऑफ इस्लाम' हा कार्यक्रम बी.बी.सी.ने १२ सप्टेंबर २००५ रोजी सादर केला होता.)*

## पर्यावरण

# चकाकत्या सोन्यामागे...

"रोमला याआधी कित्येक वर्षात असे अनुभवास आले नव्हते. इसवी सन १०६ मध्ये रोमचा सम्राट ट्रॉजन डॅन्युबच्या उत्तर भागातली आपली मोहीम फत्ते करून आला होता. त्यामुळे सगळ्या रोममध्येच जल्लोषाचे वातावरण होते. रोमच्या सर्कस मॅक्झिमसमध्ये जंगी विजयोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या विजयाप्रीत्यर्थ सम्राटाने अनेक नवीन योजनांच्या घोषणाही केल्या. ट्रॉजनच्या विजयोत्सवाचे कारणही तसेच होते. त्याच्या अलीकडच्या काही स्वाऱ्यांमुळे आजवर कधीही झाला नव्हता एवढा रोमन साम्राज्याचा विकास झाला होता. त्या काळी डॅन्युबच्या उत्तर भागात राहणाऱ्या डॅशियनचा या युद्धात त्यांनी पाडाव केला होता. डॅन्युबचा हा भाग आज 'रुमानिया' म्हणून ओळखला जातो. 'रुमानिया'च्या अल्बर्नस मेयर भागात सोन्याच्या पुष्कळ खाणी आहेत. डॅशियन राजा डेसेबॅलस याला नेस्तनाबूत करून या खाणींवर आता ट्रॉजनने कब्जा मिळवला होता. त्यामुळे या विजयोत्सवात सुवर्णाची मुक्तहस्ताने उधळण चालू होती."

या घटनेनंतर जवळ-जवळ दोन हजार वर्षांनी, म्हणजे एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला, फ्रँक टिमिस या रुमानियाच्या व्यावसायिकाचे अल्बर्नस मेयरच्या प्रांतात आगमन झाले. टिमिस हा हेरॉइनचा धंदा करणारा एक अट्टल गुन्हेगार होता. त्याने आजवर केलेले अनेक व्यवसाय बुडीत खाती गेले होते. त्यानंतर काही वर्षांसाठी त्याने ऑस्ट्रेलियाला पलायन केले. परंतु, आता तो 'गॅब्रियल रिसोर्सेस' नामक बहुराष्ट्रीय कंपनीचा सर्वेसर्वा म्हणून परतला होता. या भागातील खाणीत मुबलक प्रमाणात असलेले सोने लुटून नेण्याचा त्याचा बेत होता. अगदी ट्रॉजनच्या काळापासून या खाणीतून ठराविक प्रमाणातच आणि ठराविक दिवसांनीच सोने काढले जाई. खाणउद्योगाचा कुठलाही अनुभव नसताना, कुठलाही मागचा पुढचा विचार न करता टिमिसने केलेले हे कृत्य पर्यावरणाला हानिकारकच होते.

अल्बर्नस मेयरचा हा भाग आज 'रोसिया मॉंटाना' म्हणून ओळखला जातो. युरोपातील सर्वांत जास्त सोन्याचा साठा या भागात सापडतो. ट्रॉजनप्रमाणेच टिमिसही

जाणून होता की, या भागातले जास्तीत जास्त सोने हस्तगत करण्यातच आपला मोठा फायदा आहे. ...... स्टिफनी रुथ ही कहाणी वारंवार सांगते. स्टिफनी काही वर्षांपूर्वी 'इकॉलॉजिस्टच्या' प्रचार मोहिमेची संपादक म्हणून काम करीत असे. तीन वर्षांपूर्वी तिने या खाणींच्या बचावासाठी मोहीम उघडली आणि तिच्या या कामासाठी तिला 'गोल्ड्मन एनव्हार्यनमेंटल' पुरस्काराने गौरविण्यात आले. स्टिफनी म्हणते, ''टिमिसची एकंदर योजनाच पर्यावरणाचा समूळ नाश करणारी आहे. इथे येणाऱ्या उद्योजकांनी, शेतकऱ्यांनी अगोदरच येथील शांततेचा भंग केला आहे. हा सगळाच भाग सृष्टीसौंदर्याने नटलेला आहे, येथे वास्तव्य करून असणारे समूह पारंपरिक आयुष्य जगणारे आहेत. मोठे दर्गे, मंदिरे, रोमन संस्कृतीचे अवशेष यासारख्या पुराणकाळाशी नाते सांगणाऱ्या अनेक गोष्टी या भागात आहेत आणि अशा भागात 'गॅब्रियल'ची 'ओपन -कास्ट माइन' बांधण्याची योजना आहे.''

ही योजना थोडक्यात अशी -डोंगरांना सुरुंग लावून ते उद्ध्वस्त करायचे, हे खडक दुसरीकडे नेऊन त्यांना सायनाईड लावून त्यातून सोने वेगळे करायचे. ही प्रक्रिया केल्यानंतर खाली जो चिखल उरतो, त्यात सायनाईड, पारा आणि इतर विषद्रव्ये मोठ्या प्रमाणावर असतात. हा चिखल मग एका खड्ड्यात जमा करून इथल्या डोंगर -दऱ्यांत सोडून द्यायचा. स्टिफनी म्हणते की, ज्या ठिकाणी दोन हजार माणसांचे वास्तव्य आहे, अशा भागात ही योजना राबविण्याचा त्यांचा विचार आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे या परिसराला कायद्याचे संरक्षण आहे. मग सरकार त्याविरूद्ध मूग गिळून का बसले आहे ? या घटकेला स्थानिक रहिवाशांनी त्यांच्या या कृत्याला जोरदार आक्षेप घेतला आहे. 'गॅब्रियल रिसोर्स'मुळे इथल्या दोन हजार लोकांचे जीवन अक्षरशः उघड्यावर येणार होते. यात शेकडो घरे आणि सोळा हजार हेक्टर शेतजमिनीचे नुकसान होणार होते. हा विनाश इथेच थांबत नाही, तर सोने मिळवताना खाली उरलेला विषद्रव्यांचा गाळ जास्त हानीकारक होता. त्यामुळे पिण्याचे पाणी दूषित होऊन एक लाख लोकांना पाणीटंचाईला सामोरे जावे लागणार होते. 'गॅब्रियल'च्या विरोधात रॉथ आणि मंडळींनी लढा कसा उभारला आणि त्या कंपनीला त्याची कशी दखल घ्यावी लागली याची कथा उद्बोधक आहे.

रॉथ रॉसिया म्हणते, ''२००१ च्या सुमारास 'द इकॉलॉजिस्ट' साठी काम करीत असताना मी ट्रान्सिल्वानिया येथे उभारण्यात येणाऱ्या 'ड्रॅक्युला थीम पार्क' विषयी माहिती वाचली. हा सगळाच प्रकार मला भयंकर वाटला. या पार्कच्या

विरोधात प्रचार करणाऱ्या लोकांना मी गाठले आणि त्यांच्याबरोबर प्रतिनिधी म्हणून काम करू देण्याची विनंती केली. आम्ही त्यांना ते पार्क उभारण्यापासून परावृत्त केले. यावेळी बरेच शिकायलाही मिळाले. रुमानिया हा तसा गंभीर देश आहे. या लोकांना अशा गंमतीशीर पद्धतीने लढा देणे माहितच नव्हते. कारण, बरीच वर्षे ते गुप्त पोलिसांच्या धाकातच राहिले. थीम पार्कच्या आघाडीवर मिळवलेला विजय रॉथसाठी खूपच महत्त्वाचा होता. या प्रकल्पामुळे शहराच्या मध्यवस्तीतील पुरातन ओक वृक्षाचे वनच भक्ष्यस्थानी पडणार होते. यानंतर रॉथला एला पत्रकाराकडून इथे उभारण्यात येणाऱ्या प्रकल्पाविषयी माहिती समजली. या प्रकरणाची शहानिशा करण्यासाठी ती मॉंटानामध्ये पोचली. तिथे संपूर्ण प्रकल्पाची आणि त्यांच्या विरोधाची कारणे तिने जाणून घेतली. तिला त्यांची कारणे बरीच सयुक्तिक वाटली. परंतु, या कंपनीच्या ताकदीपुढे निभाव लागण्यासाठी त्यांना खूप मोठ्या प्रमाणावर पाठिंब्याची गरज होती. एव्हाना 'गॅब्रियल रिसोर्सेस'ने बरीच पुढची मजल मारली होती. स्थानिक सरकारी अधिकाऱ्यांना आणि सांस्कृतिक मंत्रालयाला त्यांनी खिशात टाकले होते. सुरुवातीला या प्रकल्पाला फक्त स्थानिक रहिवाशांनी आणि शेतकऱ्यांनी विरोध केला. परंतु, त्यांना एवढ्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कंपनीला टक्कर द्यायचा अनुभव नव्हता. पण, आज आपण विरोध केला नाही तर उद्या आपले अस्तित्व उरणार नाही, या एकाच विचाराने त्यांनी विरोध सुरू ठेवला आणि त्यातूनच युरोपातील पर्यावरण बचावाची सर्वांत मोठी सामाजिक चळवळ उभी राहिली.

रॉथ म्हणते, "तुम्हाला या सगळ्याच घटना जागतिकीकरणाच्या आणि रुमानियाचा युरोपीय संघात प्रवेश करण्याच्या पार्श्वभूमीवर तपासून पाहायला हव्यात. रुमानियाचे सरकार त्याला शक्य तेवढे व्यवसाय विकून टाकण्याच्या मार्गावर आहे. रॉसिया मॉंटाना भागातील ही खाण आज राज्य सरकारच्या मालकीची आहे. पण, रुमानियाने युरोपीय संघात प्रवेश करताच या प्रकल्पाला राज्य सरकारचे अनुदान मिळू शकणार नाही. त्यामुळे सरकारला हा प्रकल्प बंद करावा लागणार. हा प्रकल्प बंद करून पर्यावरण रक्षणाला मदत करणे, ही आता सरकारी जबाबदारी आहे. असे करण्याऐवजी त्यांनी या प्रकल्पाचे खाजगीकरण करायचे ठरविले आणि सर्व सूत्रे 'गॅब्रियल'च्या स्वाधीन करायचे ठरविले. त्यांच्यादृष्टीने हा श्रेयस्कर मार्ग होता. कारण, या मार्गाने त्यांच्याकडे पैसाही येत होता आणि जबाबदारीही संपत होती. त्यामुळे हा प्रकल्प बंद करून परिसर स्वच्छ करण्याऐवजी ते हा प्रकल्प अशा

कंपनीला विकत आहेत ज्यांच्या योजना हा प्रकल्प आणखी पन्नासपट मोठा करण्याच्या आहेत." 'गॅब्रियल रिसोर्सेस'ला नमते घ्यायला लावायचे असेल तर रॉथला ही चळवळ अधिक व्यापक करणे भाग होते. या चळवळीला आंतरराष्ट्रीय स्वरूप देण्यासाठी तिने आपला व्यवहार इंग्रजी भाषेत सुरू केला. स्वतःची वेबसाईट तयार केली आणि लोकांनाही मदतीचे आवाहन केले. बुखारेस्टमधील एका स्वयंसेवी संस्थेच्या सहकार्याने लोकांचा मेळावा घेतला. या मेळाव्याला रुमनियातील पन्नास स्वयंसेवी संस्थांनाही आमंत्रित केले आणि त्यांना या प्रकाराची माहिती दिली. राष्ट्रीय पातळीवर या प्रकल्पाच्या विरोधात काम करण्यासाठी एक गट स्थापन केला. रुमानियाच्या बाहेर जाऊन रॉथने 'ग्रीनपीस'शी संपर्क साधला. अशा रीतीने विरोधाला हळूहळू बळकटी येत गेली.

विरोधकांनी कंपनीला आणि सरकारला उघडे पाडायचा जणू चंगच बांधला होता. परंतु, विरोधकांचे बळ जसजसे वाढत होते, तसतसा प्रकल्प तडीस नेण्याचा कंपनी आणि सरकारचा निश्चयही दृढ होत होता. ते तितक्याच नेटाने प्रतिकार करीत होते. या कामी रुमानियाच्या सांस्कृतिक मंत्रालयाचा विशेष पुढाकार होता. रॉथ म्हणते, "सांस्कृतिक मंत्रालय लबाड आहे. गेल्या काही वर्षांपासून त्यांचे या भागात उत्खननाचे काम चालू आहे. पण, ज्या जागा उत्खननाच्या दृष्टीने महत्त्वाच्या नाहीत, तेथेच ते उत्खनन करतात आणि त्या पार्श्वभूमीवर जो संरक्षित भाग आहे, त्याचे मूल्यमापन करून कंपनीला आपले पाय पसरायला संमती देतात. आम्ही त्यांच्या संमतीलाच आव्हान दिले आणि नुकताच एक महत्त्वपूर्ण खटला जिंकला. त्यामुळे एका संरक्षित भागावर पुन्हा कब्जा मिळविण्यात आम्ही यशस्वी झालो. कंपनीच्या दुर्दैवाने आम्ही परत मिळविलेल्या डोंगराच्या या भागात सोन्याच्या सर्वाधिक खाणी आहेत आणि तितकेच महत्त्वाचे रोमन अवषेशही आहेत. आता त्यांच्या प्रकल्पातून हा भाग वगळला तर तो प्रकल्प संपल्यातच जमा आहे."

आजच्या जगात जिथे फक्त आर्थिक फायदाच बघितला जातो, तिथे रॉथ आणि तिच्या शेतकरी मित्रांचा कसा निभाव लागणार ? पण रॉथ म्हणते,"हे शेतकरी फक्त धान्य पिकविणारे कष्टकरी नाहीत, तर ते जमिनीचे मालक आहेत. त्यांनी कंपनीला जमीन विकायला नकार दिला आहे. त्याबरोबरच रुमानियाच्या इतिहासात पहिल्यांदाच इथले चर्चही कंपनीच्या विरोधात उभे ठाकले आहेत. त्यांच्याही या भागात जमिनी आहेत आणि त्यांनीही त्या विकायला ठाम नकार दिला आहे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे

हा एक खाजगी प्रकल्प आहे. त्यामुळे कुणीही कायद्याचा धाक दाखवून जमीन बळकावू शकत नाही. आणि आता तर हा प्रकल्प होणे जवळ-जवळ अशक्य आहे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कारण, रुमानिया युरोपीय समुदायाचा सदस्य बनण्यास उत्सुक आहे. गेल्या वर्षी युरोपीय संसदेने या प्रकल्पाची पाहणी केली आणि या खाणी मुळे पर्यावरणाला गंभीर धोका असल्याची तक्रार रुमानियाच्या सरकारकडे केली आहे. त्यामुळे रुमानियाचा युरोपीय समुदायातील प्रवेश याच अटीवर अवलंबून आहे. त्यामुळे माझे मत म्हणाल तर 'गॅब्रियल रिसोर्सेस'ला आता गाशा गुंडाळणे भाग आहे.'' 'गॅब्रियल' आणि त्याचे पाठीराखे मात्र पूर्ण हार मानायला तयार नाहीत. कायद्याचे सर्व मार्ग बंद झाल्यावर त्यांनी आता इतर मार्गांचा अवलंब करायला सुरुवात केली आहे. रॉथला याची पूर्ण कल्पना आहे पण ती म्हणते, ''मी त्यांच्या धमक्यांना भीक घालत नाही. खाणीत काम करणारा एखादा कामगार येतो आणि त्याच्या नोकरीला जरा जरी धक्का लागला तर मला जीवे मारण्याची धमकी देऊन जातो. वास्तविक, या कामगारांना कंपनीच्या अधिकाऱ्यांनीच भडकावले आहे. या कामगारांना आधी पैशाचे, नोकरीचे आमिष दाखवायचे आणि त्यांच्या सुखाच्या आड आम्ही कसे येत आहोत, हे पद्धतशीर पटवून द्यायचे. असे भडकलेले कामगार प्रसंगी माझ्या सहकाऱ्यांना मारहाणही करतात.'' रॉथही अशाच एका जीवघेण्या हल्ल्यातून सुदैवाने बचावली. गेल्या तीन वर्षातला क्षण न् क्षण रॉथने या लढ्यासाठी दिला आहे. वास्तविक, रुमानिया हा तिचा देशही नाही. तरीही ती स्वतःचा जीव धोक्यात घालून हा खटाटोप का करते आहे रॉथ म्हणते, ''ज्या गोष्टींवर ज्या तत्त्वांवर माझा विश्वास आहे त्यासाठी कुठलाही त्याग करायला मी मागे-पुढे पाहत नाही. त्या गोष्टी करण्यातच माझ्या आयुष्याचा खरा अर्थ सामावला आहे.''

अशी ही रॉथच्या लढ्याची कहाणी. सोन्याचांदीच्या दागिन्यांची अफाट हौस असणाऱ्या आपल्यासारख्या सगळ्यांनीच आवर्जून वाचावी अशी. दिवाळी-दसऱ्यासारख्या सणासुदीच्या काळात तर सोन्याच्या या हौसेचे रूपांतर सोन्याच्या सोसात होते! सोसासोसाने मग सोन्याची खरेदी सुरू होते. खरेदीचा जोर वाढला की सोन्याच्या किमतींची कमान चढायला लागते. अलीकडेच तिने पार सात हजारांचा टप्पाही ओलांडला तो याच सोसापायी. मात्र, या चकाकत्या सोन्याच्या मागे कायकाय दडलेले असते, त्याची फिकिर कितीजणांना असते?

*(संदर्भ - द इकॉलॉजिस्ट, जून २००५)*

# 'लवचिक' दृष्टी

विकसित आणि विकसनशील राष्ट्रांतील आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीतील तफावतीबद्दल आपण कायमच बोलतो. या आर्थिक आणि सामाजिक तफावतीमुळे विकसनशील राष्ट्रांना काही मूलभूत प्रश्नांना सामोरे जावे लागते. त्यांच्या गरजाही अत्यंत मूलभूत असतात. आपल्या अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या गरजा पुऱ्या करतानाच त्यांचे दिवसाचे चोवीस तास खर्ची पडतात. मात्र विकासाचे इतर प्रश्न तसेच अनुत्तरित राहतात. आरोग्याचा प्रश्नही अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याच्या प्रश्नाइतका मूलभूत आणि तितकाच महत्त्वाचा.

जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे राष्ट्रांची बंधने गळून पडली आणि माणूस, 'माणूस' या नात्याने एकमेकांच्या जवळ आला. त्यामुळेच आजचे संशोधक 'हे विश्वचि माझे घर' या भावनेने आपल्या ज्ञानाचा उपयोग केवळ आपल्या देशाकरिता न करता अशिक्षित, अविकसित आणि गरीब देशांना करून देण्यासाठी प्रयत्नशील आहेत. जोशुआ सिल्व्हर हे त्यापैकीच एक. जगातील लाखो-करोडो लोकांची दृष्टी अधू असते. त्यातील अगदी थोड्याच लोकांना योग्य ते उपचार मिळतात आणि हे सर्वजण विकसित देशातील असतात. जोशुआ सिल्व्हर हे ऑक्सफर्ड विद्यापीठात पदार्थविज्ञानशास्त्राचे संशोधक आहेत. काही वैशिष्ट्यपूर्ण भिंगांवर आणि आरशांवर प्रयोग करीत असताना त्या भिंगांची ताकद कमी-जास्त करण्याचे तंत्र त्यांना सापडले. लखकन् त्यांच्या डोक्यात विचार चमकून गेला. आपण या 'ॲड्जस्टेबल' भिंगांचा वापर दृष्टिदोष कमी करण्यासाठी केला तर ? जोशुआंना स्वतःला चष्मा आहे. त्यामुळे हा प्रयोग त्यांनी आधी स्वतःवर करायचे ठरविले आणि त्यात ते यशस्वीही झाले.

जोशुआ सिल्व्हर हे स्वतः उदारमतवादी आहेत. त्यामुळे आपल्या तंत्राचा उपयोग केवळ आपल्या देशापुरताच मर्यादित न ठेवता, ज्यांना पैशाअभावी आणि उपचारांच्या उपलब्धतेअभावी डोळ्यांवर उपचार करून घेणे शक्य नाही; अशा गरीब आणि विकसनशील देशांतील लोकांसाठी जोशुआ यांनी कार्य करायचे ठरविले. त्यासाठी त्यांनी १९९० मध्ये स्वतःची 'ॲडाप्टिव्ह आयकेअर' ही कंपनी स्थापन केली.

जोशुआ म्हणतात की, विकसित देशांतील लोकांना डोळ्यांवर इलाज करून घेणे सहज शक्य असते. पण बहुतांश विकसनशील देशांमध्ये ऑप्टोमेट्रिस्ट, नेत्रतज्ज्ञ आणि चष्म्यांची निर्मिती करणारे उत्पादक यांचे जाळे अपुरी असते किंवा अस्तित्वातच नसते. या व्यवसायासाठी पायाभूत सेवा-सुविधा, प्रशिक्षित व्यावसायिक लागतात. आज ब्रिटनमध्ये चार हजार लोकांमागे एक ऑप्टोमेट्रिस्ट असतो. तर आफ्रिका खंडात काही ठिकाणी दहा लाख लोकांमागे एक ऑप्टोमेट्रिस्ट असतो. जोशुआ म्हणतात, विकसनशील देशांमध्ये या क्षेत्रात अधिकाधिक व्यावसायिक तयार करणे हे तसे कठीण काम आहे. यात आर्थिक गुंतवणुकीचा मुद्दा तर आहेच, पण या देशांत असे प्रशिक्षित व्यावसायिक तयार केले तर ते स्वतःच्या फायद्यासाठी बाहेरचा मार्ग धरण्याचीच शक्यता जास्त असते.

जोशुआंनी तयार केलेली 'अॅड्जस्टेबल' लेन्स ही द्रवाने भरलेली आणि प्लॅस्टिकचे पातळ आवरण असलेली एक छोटी, चपटी पिशवीच आहे. या पिशवीतील द्रव कमी-जास्त करून तुम्ही या भिंगाची वक्रता बदलू शकता. वक्रता बदलली की त्याची ताकदही बदलते.

जिनिव्हातील जागतिक आरोग्य संघटनेच्या अंधत्व निवारण कार्यक्रमाचे अध्यक्ष बॉन मायलेफोर्स यांची आणि जोशुआंची १९९४ मध्ये भेट झाली. बॉन यांच्या म्हणण्यानुसार जगात असे अब्जावधी लोक आहेत जे डोळ्यांवर उपचार करू शकत नाहीत. या भेटीत जोशुआ त्यांना म्हणाले की, ''या प्रश्नावर मात करू शकेल अशी पद्धती माझ्याकडे आहे.'' ''जर अशी काही पद्धती उपलब्ध असेल तर ताबडतोब मी ती उपयोगात आणली पाहिजे,'' असे बॉन यांनी सांगितले आणि जोशुआंच्या कार्याला एकप्रकारे हिरवा कंदीलच दाखविला. जोशुआंना नवनवीन तंत्रज्ञान शोधण्यासाठी सतत प्रयोग करत राहण्याची सवय पहिल्यापासून आहे. भिंगांशी आणि आरशांशी खेळता-खेळता काही नवीन तंत्रज्ञान उमगेल, असे त्यांना स्वप्नातही वाटले नव्हते. आज त्यांच्या हातात हे समाजोपयोगी तंत्र आहे आणि त्याचा वापर कसा करायचा याची योजनाही तयार आहे. आपले हे साधन स्वस्तात तयार करणे आणि ते सोप्या पद्धतीने वापरता येईल अशा रीतीने बनविणे, हा त्यांचा मुख्य उद्देश आहे. त्यामुळे प्रत्यक्ष लोकांपर्यंत ते तंत्र पोचताना मध्ये ऑप्टोमेट्रिस्ट, नेत्रतज्ज्ञ किंवा इतर व्यावसायिक यांची कुठलीच मदत घ्यावी लागणार नाही, हीच 'अॅडाप्टिव्ह स्पेक्टॅकल्स'ची मूळ कल्पना आहे. आज याच कल्पनेनुसार 'अॅडाप्टिव्ह आयकेअर'ने चीनमध्ये आपली

कंपनी थाटली आहे. जोशुआ म्हणतात, ''नुकतेच आम्ही घानामध्ये प्रौढ साक्षरता अभियानांतर्गत चष्म्यांचे दहा हजार जोड वाटले. या लोकांना फळ्यावरच्या मोठ्या अक्षरातील मजकूर वाचता येत असे. पण पुस्तकातला मजकूर वाचायला अडचणी येत. 'ॲडाप्टिव्ह आयकेअर'ने त्यांचा हा प्रश्न सोडविला. आम्ही तयार केलेले चष्मे किंवा लेन्स वापरायला अत्यंत सोप्या आहेत. या लेन्समधील द्रवावर त्यांची वक्रता अवलंबून असते. हा द्रव कमी-जास्त करण्यासाठी एक सिरिंज दिली जाते. सुरुवातीला सर्वांत जास्त क्षमतेवर भिंग सेट करायचे आणि एक डोळा बंद करून डोळे तपासण्यासाठी असणारा तक्ता वाचायचा. हळूहळू सिरिंजद्वारे या भिंगातील द्रव कमी करत जायचे आणि अचूक वाचता येईल असे वाटल्यावर भिंग त्यादृष्टीने सेट करायचे आणि सिरिंज काढून घ्यायची. हाच प्रकार दुसऱ्या डोळयाच्या बाबतीतही करायचा. या सगळ्या प्रकाराला एक मिनिटही लागत नाही. अगदी सामान्यातला सामान्य आणि अशिक्षित माणसालाही सहज वापरता येण्याजोगे हे साधन आहे.''

जोशुआंचा अनुभव सांगतो की, हे लोकही एखाद्या नेत्रतज्ज्ञाच्या सफाईने आणि अचूकपणे हे सर्व करतात. अर्थात यामुळे डोळ्यांचे सर्व प्रकारचे दृष्टिदोष आपण बरे करू शकत नाही. पण नव्वद टक्क्यांपेक्षा जास्त लोकांच्या गरजा त्यामुळे भागविता येतात.

जोशुआ म्हणतात, ''या साधनाची किंमत अत्यंत वाजवी आहे आणि अर्थातच ती प्रत्येक देशानुसार बदलती आहे. कारण, त्यांच्या उत्पादनापासून ते लोकांच्या हातात पडेपर्यंत मध्ये कुठलीच साखळी नसल्याने या किंमतीत ते उपलब्ध करून देणे आम्हाला परवडते. २०२० पर्यंत हे साधन जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोचविण्याचे जागतिक आरोग्य संघटनेचे उद्दीष्ट आहे. ही संस्था अधिकाधिक वाढून त्याचा लाभ या लोकांना मिळाला की, आम्ही आमचे ध्येय गाठले असे समजायला हरकत नाही.''

*(संदर्भ - न्यू सायंटिस्ट - २० ऑगस्ट २००५)*

इतिहास

# ....आणि १८८३ मध्ये लंडन हादरले तेव्हा....

इस्लामी अतिरेक्यांच्या कारवाया ही सध्याच्या जागतिक राजकारणातील एक डोकेदुखी ठरली आहे. अलीकडे इंडोनेशियातील बाली येथे व त्याआधी लंडनच्या भुयारी रेल्वेमार्गावर ७ जुलै २००५ रोजी झालेल्या बाँबस्फोटाने या डोकेदुखीत आणखी भर पाडली आहे. भुयारी मार्गावरील चार महिन्यांपूर्वीच्या बाँबस्फोटाने लंडन हादरले खरे, पण भुयारी रेल्वेत असे बाँबस्फोट होणे, ही लंडनच्या इतिहासातील पहिली घटना नव्हे. या घटनेशी साधर्म्य दर्शविणारी घटना साधारणपणे सव्वाशे वर्षांपूर्वी म्हणजे ३० ऑक्टोबर १८८३ रोजी घडली होती आणि तेव्हाही लंडन हादरले होते. उल्लेखनीय बाब म्हणजे ७ जुलै २००५ प्रमाणे तेव्हादेखील 'एजवेअर रोड' या ठिकाणी एक बाँबस्फोट झाला होता.

त्या काळी लंडनमधील भुयारी रेल्वे ही जगातील एकमात्र भुयारी रेल्वे होती. 'द डायनामाइट वॉर' या नावाने छेडल्या गेलेल्या युद्धात, ब्रिटिश सरकार व लंडनमधील प्रतिष्ठितांच्या विरोधात, 'आयरिश-अमेरिकन रिपब्लिकन्स' हा गट उभा ठाकला होता. तेव्हा झालेले बाँबस्फोट व त्यासंबंधी सार्वजनिक नागरिक, प्रसिद्धिमाध्यमे, सरकार यांनी व्यक्त केलेली प्रतिक्रिया आणि या वर्षी जुलै महिन्यातील बाँबस्फोटानंतरचे लंडनमधील वातावरण यांची तुलना 'युद्धस्य कथा...' याची प्रचिती आणून देते.

**१८८० च्या दशकातील बाँबस्फोट**

लंडन शहरातील मॅन्शन हाउस ही इमारत उडवून देण्याच्या असफल प्रयत्नांपासून १८८० च्या दशकातील बाँबस्फोटाच्या घटनांची सुरुवात झाली. १८८३ च्या मार्च महिन्यात व्हाइटहॉल येथील स्थानिक प्रशासनाच्या इमारतीच्या प्रवेशद्वारासमोर एक बाँबस्फोट झाला. त्यानंतर ३० ऑक्टोबर १८८३ रोजी लंडनमधील भुयारी रेल्वेमार्गावर, एकाचवेळी म्हणता येईल असे, दोन बाँबस्फोट झाले. बोगद्यात बाँबस्फोट झाल्याने, प्रेड स्ट्रीट स्थानक सोडून एजवेअर रेल्वेस्थानकाकडे निघालेल्या एका आगगाडीचे मोठे नुकसान झाले. या गाडीच्या शेवटच्या तीन डब्यांची तावदाने फुटली आणि लाकडी

सामान इतस्ततः विखुरले. चार प्रवाशांच्या डोक्याला इजा झाली आणि इतर काही प्रवासी जखमी झाले. जखमींमध्ये बहुतांश 'कामगार' या गटात मोडणारे होते. यानंतर लगेचच चारिंग क्रॉस स्थानक आणि वेस्टमिन्स्टर स्थानक यांच्यामधील बोगद्यात बाँबस्फोट झाला. त्या वेळी तेथून एकही गाडी जात नसल्याने मोठा अपघात टळला. पण स्थानकाजवळच झालेल्या या स्फोटामुळे प्लॅटफॉर्मचे बरेच नुकसान झाले. नायट्रोग्लिसरिन या घटकामुळे हे स्फोट घडून आल्याचे दोन्ही स्फोटांच्या चौकशीअंती आढळून आले.

वृत्तपत्रांनी या घटनेवर खेद व्यक्त करून त्याला योग्य प्रसिद्धी दिली; मात्र ही अतिकाळजी करण्यासारखी वा फार धोकादायक बाब आहे, असे काही म्हटले नाही. 'द टाइम्स'ने असे मत व्यक्त केले की, ''अशा स्फोटांमुळे मोठे नुकसान होऊ शकते पण प्रत्येक रेल्वेस्थानक व आगगाडीला याबाबत सुरक्षा पुरविणे अशक्यच आहे.'' या घटनेनंतर लंडनमधील नागरिकांनी चिंतायुक्त गोंधळाचे प्रदर्शन न करता जो संयम दाखविला त्याबाबत नागरिकांचे कौतुक केले गेले. अर्थात, त्या काळातील नागरिकांनी असे बाँबस्फोट नव्हे, पण यापेक्षा भयंकर असे रेल्वे अपघात पाहिले होते.

**सरकार सतर्क**

या घटनेनंतर सतर्क होऊन बाँबस्फोट घडवून आणणाऱ्यांना पकडून पुढील बाँबस्फोट न होऊ देण्याचे मोठे काम ब्रिटनमधील तत्कालीन गृहमंत्री वर्नान हार्कोट यांनी केले. तत्कालीन पंतप्रधान ग्लॅडस्टोन यांना याबाबतची माहिती देताना त्यांनी स्पष्ट केले की, ब्रिटनमध्ये अशा विध्वंसक कारवाया करण्याच्या हेतूने काही व्यक्ती संघटितरित्या व नियोजनबद्ध असे प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर करीत आहेत. एवढे करून ते थांबले नाहीत; तर, भुयारी रेल्वे व लंडन शहरातील काही सार्वजनिक इमारती यांच्या संरक्षणासाठी त्यांनी तीनशे अतिरिक्त पोलिस तैनात केले. हार्कोट यांच्या असेही लक्षात आले की, डायनामाइट आणि नायट्रोग्लिसरिन यांमुळे संरक्षण यंत्रणेपुढे एक नवीन आव्हान उभे राहिले असून त्यावर काही नवीन उपाययोजना करणे गरजेचे आहे.

वरील बाब लक्षात घेऊन त्यांनी ज्वालाग्राही घटक बाळगण्यास बंदी घालणारे 'एक्सप्लोझिव्ह्ज् बील' तेथील सभागृहांपुढे मांडले. त्याचे दीड तासात वाचन होऊन ते त्वरित मंजूरही करण्यात आले. ज्या वेगाने हे विधेयक मांडण्यात येऊन ते मंजूर करण्यात आले ती पद्धत अनेकांना पटली नाही. काहींचे म्हणणे असे होते की, असे विधेयक एवढ्या घाईने मांडण्याची गरज नव्हती. विरोधी पक्षनेते लॉर्ड सॅलिस्बरी यांनी

असे मत व्यक्त केले होते की, या संदर्भात काही तात्पुरती उपाययोजना केली तरी ते भागण्यासारखे होते. ग्लॅडस्टोन यांचे सचिव हॅमिल्टन यांना असे वाटत होते की, ग्लॅडस्टोन शांत आहेत व त्या मानाने हार्कोट फार अस्वस्थ झाले असून फार घाईत कृती करीत आहेत. हॅमिल्टन यांना असेही वाटत होते की, सरकारने त्वरेने पावले उचलली तर बॉंबस्फोट करणारे आणखी चिडून काही कृती करतील. मात्र, हार्कोट यांना असे वाटत होते की, अशा कारवाया रोखण्यासाठी कडक उपाययोजना आखणेच आवश्यक होते. कारण, अशा कारवाया घडवून आणणाऱ्या 'आयरिश-अमेरिकन रिपब्लिकन ऑर्गनायझेशन'शी संबंधित व्यक्ती अमेरिकेत दडून बसल्या असताना ब्रिटनला आपल्या सुरक्षेची काळजी घेणे भाग होते. एक महत्त्वाची बाब अशी की, आयरिश-अमेरिकन समाजाचा किंवा आयर्लंडमधील वा ब्रिटनमधील आयरिश समाजाचा व्यापक पाठिंबा या गटाला नव्हता. उलट, अशा कारवायांमुळे आयरिश समाजाचे नुकसानच होईल, म्हणून त्यांना रोखलेच पाहिजे, असेही काहींचे मत होते. हार्कोट यांनी तर बॉंबस्फोट घडवून आणणाऱ्या व्यक्ती या, 'मानवी समाजाच्या शत्रू' आहेत, असे ठाम मत मांडले होते.

असे असले तरी बॉंबस्फोट घडविणाऱ्यांचे उद्देश काही वेगळे असावेत, असेही म्हणण्यास जागा आहे. जसे की १८८४ मध्ये व्हिक्टोरिया रेल्वेस्थानकात स्फोट झाला तेव्हा तेथून रवाना होणाऱ्या सर्व गाड्या निघून गेल्या होत्या व तेथे येणाऱ्या गाड्यांपैकी शेवटची गाडी येऊन पोचली होती व स्थानकावर तसा शुकशुकाटच झाला होता. कारण, बॉंबस्फोट घडवून आणणाऱ्यांमधील एक विलियम लोमास्ने याला निरपराधांच्या हत्या टाळायच्या होत्या. जखमींची संख्याही त्याला वाढलेली नको होती. त्यामुळे नागरिकांना मारण्यापेक्षा मालमत्तेचे नुकसान करावे, अशा सूचना त्याने आपल्या सहकाऱ्यांना दिल्या होत्या. १८८४ च्या डिसेंबरमध्ये लंडन ब्रिजखाली बॉंब ठेवण्याच्या प्रयत्नात चकमक होऊन तो मारला गेला. पण या नंतरही बॉंबस्फोटांचे सत्र चालूच होते. जानेवारी १८८५ मध्ये भुयारी रेल्वेत पुन्हा एकदा बॉंबस्फोट झाला. बॉंबस्फोट करणाऱ्यांचे भुयारी रेल्वेला लक्ष्य बनविण्याचे एक कारण असे होते की, अंधाराचा फायदा घेऊन निसटून जाणे त्यांना शक्य होते. तरी या गटातील काही जण पकडले गेले ते त्यांच्यातील दुफळीमुळे. दुसरे कारण म्हणजे, पंतप्रधान ग्लॅडस्टोन यांनी 'आयरिश होमरुल'ला पाठिंबा दिल्याने चर्चेच्या वाटा मोकळ्या झाल्या. त्यामुळे १८८६ मध्ये 'डायनामाइट वॉर' संपुष्टात आले.

**तेव्हा व आता....**

लंडनमध्ये २००५ च्या जुलै महिन्यात झालेले बाँबस्फोट व १८८० च्या दशकातील बाँबस्फोट यांमध्ये मृतांची संख्या व बाँबस्फोट घडवून आणणाऱ्यांचे उद्दिष्ट या दोन्ही बाबींत जमीन-अस्मानचे अंतर होते. जे बळी पडले त्यांची पार्श्वभूमीही वेगळी होती. जुन्या काळातील बाँबस्फोटात पुरुषांचा व विशेषत: कामगार वर्गाचा समावेश होता; तर, या वर्षी झालेल्या बाँबस्फोटात श्रमिकांची संख्या कमी होती, तसेच काही स्त्रिया आणि ब्रिटिश नागरिकांशिवाय इतर वंशियांचाही समावेश होता. आणखी एक महत्त्वाचा फरक म्हणजे, बाँबस्फोट घडवून आणणाऱ्यांबद्दलचा भाषिक उल्लेखही वेगळा होता. 'आयरिश-अमेरिकन रिपब्लिकन ऑर्गनायझेशन'शी संबंधित असलेल्यांना 'क्रांतिकारी' म्हटले जात होते, तर त्याउलट या काळातील हल्लेखोरांना 'दहशतवादी' म्हटले गेले आहे.

बाँबस्फोटाच्या या घटनांना सामान्य जनतेने व सरकारी यंत्रणेने दिलेल्या प्रतिसादात मात्र काही प्रमाणात साधर्म्य आढळते. बाँबस्फोट झाल्यानंतर तो घडवून आणणाऱ्या अल्पसंख्याक जमातीच्या नागरिकांना दोन्हीही घटनांमध्ये कोणी त्रास दिला नाही वा बदला घेण्याच्या उद्देशाने त्यांचा छळ केला नाही. तसेच या दोन्ही घटनानंतर सुरक्षेबाबत काही नवे कायदे करण्यात आले. या नव्या कायद्यांमुळे पुन्हा अशा घटना होणार नाहीत, असा विश्वास नागरिकांच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न सरकारने केला. तरीदेखील बाँबस्फोटाच्या दोन्ही घटनांनंतर असे स्पष्ट करण्यात आले की, अशा प्रकारच्या घटनांपासून संपूर्ण संरक्षण मात्र नागरिकांना देता येणे शक्य होईलच असे नाही. असे कृत्य करणाऱ्या संघटनांना ब्रिटनच्या बाहेरून मदत मिळत असेल तर सरकारचे काम अधिकच कठीण होऊन बसते, असाही खुलासा या दोन्ही घटनांनंतर करण्यात आला.

१८८० च्या दशकातील बाँबस्फोटांच्या घटनांनंतर चाणाक्ष राजकारणी नेत्यांच्या हे लक्षात आले की, राजकीय कृती हाच अतिरेक्यांना एकटे पाडण्याचा मार्ग आहे. त्यामुळे त्यांनी राजकीय प्रक्रिया चालू करून या प्रश्नावर तोडगा काढला. मात्र, आजच्या काळातील अतिरेक्यांच्या काही राजकीय मागण्या आहेत असे स्पष्टपणे आढळत नाही, त्यामुळे राजकीय तोडगा शक्य होईल, अशी शक्यता सध्यातरी दृष्टिक्षेपात नाही. *(संदर्भ - हिस्टरि टुडे - सप्टेंबर २००५)*

# विश्वरूपदर्शन उच्च शिक्षणाचे

'मॅट्रिक होणे' हीच आपल्या देशात एके काळी अतिशय महत्त्वाची बाब गणली जात असे. 'पदवीधर असणे' ही तर त्या जमान्यात त्याही पलीकडची दुर्मिळ आणि म्हणूनच मोठी अप्रुपाची गोष्ट समजली जाई, या विधानावर तर सध्याच्या पिढीतील कोणाचाही सहजासहजी विश्वास बसणार नाही. प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडवून आणण्याचे ध्येय नजरेसमोर ठेवण्याचे युग मागे पडून आज आपण आलो आहोत त्याच्या पुढच्या युगात - विद्यापीठीय उच्च शिक्षणाची सद्दी असण्याच्या युगात! प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडवून आणण्याच्या उद्दिष्टाची प्रस्तुतता संपली, असा मात्र याचा अर्थ मुळीच नाही. दर्जेदार, सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण ही आपल्या देशाची आजही गरज असली तरी, तसेच दर्जेदार, सहजसाध्य विद्यापीठीय उच्च शिक्षण ही आपली आजची निकड बनली आहे. केवळ आपल्या देशातच नव्हे तर, जगभरच आज हे चित्र दिसते.

जगभरातील उच्च शिक्षण प्रणालींचे सर्वेक्षण करून या चित्रात तपशीलाचे रंग भरण्याचे काम 'इकॉनॉमिस्ट'ने अलीकडील एका अंकात केले आहे. विद्यापीठीय उच्च शिक्षणाचे हे विश्वरूपदर्शन जेवढे विराट आहे तितकेच ते व्यामिश्रही आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने अन्य सर्व क्षेत्रांप्रमाणेच उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातही जगभरच जी एक अभूतपूर्व घुसळण सुरू केली आहे तिच्यामुळे या क्षेत्रासमोर अनेक नवनवीन आव्हाने उभी ठाकली आहेत. विद्यापीठीय शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडून येण्याची प्रक्रिया आणि तिची अनिवार्यता, ही दोन्ही या घुसळणीचीच अपत्ये आहेत. आजच्या जगात माहितीचे स्फोटावर स्फोट होत आहेत. ज्ञानाधिष्ठित सेवा-उद्योगांनी पटकाविलेला अग्रपूजेचा चौरंग आणि माहिती तंत्रज्ञानाचा अप्रतिहत प्रसार-प्रचार यामुळे एकूणच जीवनपद्धती ही अधिकाधिक ज्ञानाधिष्ठित बनत आहे. साहजिकच, अशा वातावरणात उच्च विद्याविभूषित असणे, हीच जगण्याची गरज ठरताना दिसते. विशेषतः, भारत आणि चीन या श्रमशक्तीबहुल दोन देशांना स्पर्धेत टिकून राहण्यासाठी त्यांच्या अफाट मनुष्यबळाचे रूपांतर उच्च शिक्षणाद्वारे भांडवलात करण्याशिवाय अन्य पर्यायच नाही.

विद्यापीठीय उच्च शिक्षण हीच एकंदररीत्या सार्वत्रिक गरज बनल्याने देशोदेशीच्या धोरणकर्त्यांसमोर प्रश्नांची एक मालिकाच उभी ठाकली आहे. अमेरिका असो, युरोप असो वा तिसऱ्या जगातील देशांचा समूह असो या प्रश्नांचे स्वरूप बव्हंशी सारखेच दिसते. विद्यापीठीय उच्च शिक्षणाच्या सुविधांना असणारी मागणी एवढ्या घाऊक प्रमाणावर आणि एकदमच वाढू लागेल, याचा कयास देशोदेशीच्या धोरणकर्त्यांना बांधता आल्याचे फारसे जाणवत नाही. परिणामी, उच्च शिक्षणविषयक सुविधांचा विकास-विस्तार मोठ्या प्रमाणावर करण्याची वेळ आल्यानंतर या संदर्भात आता सरकार अथवा शासन संस्थेची भूमिका नेमकी कोणती व कितपत असावी, हा प्रश्न आज जगाच्या वेगवेगळ्या भागांत गाजू लागला आहे.

प्राथमिक तसेच माध्यमिक शिक्षणाप्रमाणेच उच्च शिक्षणाच्या विस्ताराचीही आद्य जबाबदारी सरकारनेच स्वीकारावयास हवी, या पूर्वी अंगिकारण्यात आलेल्या परंपरागत भूमिकेस अनुसरूनच आजवर जगभर वाटचाल झाली. मात्र, उदारीकरणाचे वारे वाहू लागल्यानंतर सारेच संदर्भ पालटू लागले. 'सरकार'नामक घटकाच्या एकंदर आर्थिक-सामाजिक व्यवहारांतील अंगभूत जबाबदाऱ्यांसंबंधीच्या तात्त्विक चर्चेइतकाच सरकारी तिजोरीच्या ताकदीचाही मुद्दा कळीचा ठरू लागला. उच्च शिक्षणाच्या सुविधांचा विस्तार घाऊक प्रमाणावर घडवून आणण्यासाठी तितक्याच मोठ्या प्रमाणावरील निधीची आवश्यकता निर्माण झाली. हा वाढीव पैसा सरकारने पुरवावा हे मग ओघानेच आले. निधीची ही मागणी पुरी करण्यास सरकारी तिजोरीचे बळ कमी पडू लागल्यावर विद्यापीठांसमोर प्रश्नचिन्ह उभे राहिले. विद्यापीठीय शिक्षणाच्या पायाभूत सुविधांचा विस्तार घडवून आणत असतानाच या शिक्षणाचा दर्जाही टिकविण्यासाठी आवश्यक त्या निधीचा पुरवठा करण्यास सरकार असमर्थ असेल तर मग, प्रत्यक्षातील शैक्षणिक खर्च आधारभूत धरून त्यानुसार शैक्षणिक शुल्कांची आकारणी वास्तव पायावर करण्याची मुभा विद्यापीठांना मिळावी, अशी मागणी जगभरच पुढे येऊ लागली.

परंतु ही मागणी पूर्ण करण्यातही अनंत अडचणी होत्या व आहेत. शिक्षणासारख्या बाबीसंदर्भात इतका व्यापारी दृष्टिकोण अंगिकारणे कितपत उचित आहे, त्यापायी समाजातील गुणवंत परंतु आर्थिकदृष्ट्या दुर्बळ असणाऱ्या होतकरूंना उच्च शिक्षणाचे दरवाजे कायमचेच बंद होतील त्याचे काय, यांसारख्या कळीच्या मुद्द्यांची समाधानकारक तड लागलेली नाही. निधीचे प्रवाह आटल्याने उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात त्याचे दुष्परिणाम आढळून येऊ लागले. अर्थकारणातील अन्य क्षेत्रांच्या मानाने शिक्षणाच्या प्रांतातील

वेतनवाढीचा वेग मंदावला. वेळेवर आणि काटेकोरपणे देखभाल व मरम्मत होऊन शकल्याने विद्यापीठे तसेच महाविद्यालयांच्या इमारती तसेच ग्रंथालयांची अवस्था दयनीय बनली. उच्च शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्यांच्या संख्येत होणाऱ्या वाढीला पुरून उरेल अशा वेगाने व अशा प्रमाणात पायाभूत शैक्षणिक सुविधांचा विस्तार न झाल्याने उपलब्ध सुविधा, अध्यापक चमू आणि विद्यार्थी संख्या यांचे गुणोत्तर व्यस्त बनले. परिणामी, कळाहीन इमारती आणि एकेका तासाला विद्यार्थ्यांच्या हजेरीने ओतू जाणारे वर्ग, हे जर्मनीसारख्या देशात नित्याचे चित्र बनले आहे. या अशा चौफेर बदलत्या परिस्थितीला सामावून घेऊ शकेल, अशी उच्च शिक्षणाची व्यवस्था कशी साकारावी, हा शिक्षणविषयक धोरणे आखणाऱ्या तसेच राबविणाऱ्यांसमोरील एक सार्वत्रिक प्रश्न बनला आहे.

उच्च शिक्षणाच्या क्षेत्रातील विचारवंतांसमोर या संदर्भात उद्‌भवलेले द्वंद्व हे त्रिमुखी आहे. उच्च शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण घडवून आणत असतानाच त्याचा दर्जा आणि उत्कृष्टता यांची जपणूक आणि पाठपुरावा कसा करावयाचा, हा त्या द्वंदाचा पहिला पैलू. जागतिकीकरणाची प्रक्रिया सर्वच देशांमध्ये गतिमान बनलेली असल्याने उच्च शिक्षणप्रणालींचेही बहुराष्ट्रीयीकरण घडून येते आहे. बुद्धिवंतांच्या जागतिक समुदायाची बौद्धिक भूक भागविण्याचे उत्तरदायित्व या बहुराष्ट्रीय उच्च शिक्षणप्रणालीने तिच्याकडे घेतले आहे. अशा अव्वल दर्जाच्या बुद्धिवंतांच्या शैक्षणिक गरजांची पूर्तता करणारी वैश्विक विद्यापीठांची एक साखळी त्यातून आता गुंफली जात आहे. अशी एक जागतिक साखळी एकीकडे साकारत असतानाच सरासरी बुध्यांक असणाऱ्या बहुसंख्यांना सामावून घेणाऱ्या विद्यापीठांची मालिकाही वर्धिष्णू कशी राखावयाची, ही झाली त्या द्वंद्वाची दुसरी बाजू. निधीच्या तुटवड्याचा सामना करण्यासाठी विद्यापीठांनी आधुनिक तंत्रज्ञानाधारित शिक्षणपद्धतींचा अवलंब करीत आपल्या खर्चात बचत घडवून आणावी, या पर्यायाची चर्चा सध्या चालू आहे. त्यादृष्टीने, इंटरनेटवर आधारित 'सायबर शिक्षणा'च्या प्रणाली विकसित करण्याचा प्रस्ताव पुढे ठेवण्यात आला. अशा 'व्हर्च्युअल एज्युकेशन' मुळे इमारती, ग्रंथालये यांसारख्या ठोक भांडवली गुंतवणूकीची मागणी करणाऱ्या बाबींना कात्री लागून केवळ तज्ज्ञ प्राध्यापकांच्या 'कोअर टीम'च्या साहाय्याने दर्जेदार उच्च शिक्षण जगाच्या पाठीवर कोठेही असणाऱ्या विद्यार्थ्यांना देता येईल, असा युक्तिवाद या पर्यायाच्या पाठीराख्यांकडून केला जातो. परंतु, शिक्षणाच्या प्रक्रियेत अनुस्यूत असणाऱ्या मानवी संबंधांसारख्या संवेदनशील आद्य पैलूला पारखी होणारी ही अत्याधुनिक शिक्षणपद्धती अंती कितपत हितावह ठरेल, असा त्या द्वंद्वाचा तिसरा पैलू यातून निपजला !

या अशा तिपेडी द्वंद्वावर तोडगा शोधण्यासाठी सर्वत्रच धडपड सुरू असताना अमेरिकी उच्च शिक्षणपद्धती मात्र या नव्या आव्हानांना बऱ्यापैकी आत्मविश्वासाने सामोरी जात असल्याचे या पाहणीचे अनुमान आहे. कमालीची विविधता आणि डोळसपणे जोपासलेली लवचिकता या उभय वैशिष्ट्यांपायीच अमेरिकी उच्च शिक्षणप्रणाली बदलत्या प्रवाहांशी सुसंवाद प्रस्थापित करण्यात यशस्वी ठरली असावी. उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात आज कार्यरत असणाऱ्या संस्था, त्यांनी आखलेले विविधांगी अभ्यासक्रम, विद्यापीठादी संस्थांचे व्यवस्थापन, त्यांची कामकाजपद्धती, साधारणीकरण आणि विशेषीकरण यांचा साधलेला समतोल आणि अध्यापन व संशोधन यांची सांगड घालण्याची खुबी असे या शिक्षणप्रणालीचे अनेकानेक पैलू अन्य देशांनाही अनुकरणीय ठरावेत, असाही या अभ्यासाचा सांगावा आहे.

उच्च शिक्षणाच्या संदर्भात केंद्रीय तसेच प्रांतिक सरकारांनी स्वत:कडे घेतलेली अतिशय नेमकी, मोजकी आणि मर्यादित भूमिका, हे या प्रणालीचे (आणि कदाचित तिच्या यशाचेही!) एक प्रधान अंग आहे. अमेरिकी विद्यापीठांसाठी तेथील सरकार एखादी केंद्रीय योजना वगैरे काही आखत नाही. तेथील विद्यापीठांना एकंदरच स्वायत्तता मुबलक प्रमाणात आहे. मुख्य म्हणजे सरकारी निधी, तसेच अनुदानांवरील या प्रणालीचे अवलंबन अलीकडील काही दशकांत कमालीचे घटले आहे. ही प्रक्रिया आजही सातत्यशील आहे. केंद्रीय अथवा प्रांतिक सरकारे विद्यापीठांना अजिबातच पैसा पुरवित नाहीत, असेही नाही. मात्र, या स्त्रोतावरच निर्भर राहण्याची मानसिकता तेथे नाही. समाजातील दानशूर व्यक्तींकडून मिळणारे अर्थसाहाय्य, धार्मिक संस्थांकरवी दिली जाणारी अनुदाने, माजी विद्यार्थी संघटनांकडून येणारा देणग्यांचा ओघ, खर्चाधारित शैक्षणिक शुल्क भरणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे (आणि उत्तरोत्तर वाढणारे) प्रमाण अशा नानाविध मार्गांनी या शिक्षणव्यवस्थेस अर्थसाहाय्याचा पुरवठा होत असतो.

या सगळ्याच वास्तवाचा एक अपरिहार्य परिणाम म्हणा, वा या अवघ्या चित्राचा एक अविभाज्य घटकस्वरूप म्हणा, स्पर्धा हे या प्रणालीचे एक अंगभूत वैशिष्ट्यच बनले आहे. विद्यार्थी तसेच चांगले गुणवान अध्यापक-संशोधक मिळविण्यासाठी विद्यापीठांदरम्यान, अर्थसाहाय्य, अनुदाने तसेच निधी पदरात पाडून घेण्यासाठी एकाच विद्यापीठांतर्गत विविध विभागांत, अथवा एकाच विभागातील अनेक अध्यापकांत, तर, अभ्यासवृत्ती पटकाविण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये अशी विविध स्तरांवर ही स्पर्धा दृष्टोत्पत्तीस येते. याच प्रक्रियेचा एक भाग म्हणून समाजाभिमुख, उद्योगांच्या गरजांशी

सुसंवादी असे संशोधनप्रकल्प हाती घेण्याची प्रवृत्ती विद्यापीठांमध्ये तसेच संशोधनाला प्रामुख्याने वाहिलेल्या संस्थांमध्ये वाढते आहे. यातून उच्च शिक्षणाचे क्षेत्र आणि उद्योग क्षेत्र यांच्यादरम्यान संवाद तसेच देवाणघेवाणीचा पूल तयार होण्याबरोबरच स्वामित्त्व धन अथवा परवाना शुल्काच्या स्वरूपात अर्थार्जनाचे नवनवीन स्त्रोतही विद्यापीठीय शिक्षणपद्धतीस खुले होत आहेत.

या सगळ्याच्या नेमके उलटे चित्र युरोपमध्ये आढळून येते. युरोपातील देशोदेशीच्या उच्च शिक्षणव्यवस्थेवर तेथील केंद्रीय तसेच प्रांतिक सरकारांची पकड आजही बुलंद आहे. हे नियंत्रण तसे जवळपास सर्वस्पर्शी असे आहे. विद्यापीठांमधील अध्यापक-संशोधकांच्या नेमणूका-नियुक्त्या, त्यांची वेतनश्रेणी, शैक्षणिक शुल्काची रचना व आकारणी, विद्यार्थ्यांची निवड आणि प्रवेशप्रक्रिया, प्रवेशांचे निकष अशा विविध बाबींवर सरकारचा अंकुश दिसतो. निधीपुरवठ्याचे दोरही बव्हंशी सरकारच्याच हातात आहेत. मात्र, उच्च शिक्षणास असणाऱ्या वाढत्या मागणीचा पुरवठा करण्याच्या दृष्टीने अशा शिक्षणाच्या पायाभूत सुविधा विस्तारण्याबरोबरच त्या शिक्षणाची गुणवत्ता टिकविण्या-वाढविण्यासाठी आवश्यक त्या वाढीव निधीची पूर्तता करण्यास आता सरकारे असमर्थ ठरत आहेत. त्यामुळे, निधीची वानवा हेच युरोपातील देशोदेशींच्या उच्च शिक्षणपद्धतीसमोरील आजमितीचे मुख्य आव्हान ठरत आहे.

तिसऱ्या जगातील विकसनशील देशांमधील विद्यापीठीय शिक्षणाची व्यवस्था या दोन टोकांमध्ये कोठे तरी उभी आहे. माध्यमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा टप्पा या देशांनी आता ओलांडलेला असल्याने उच्च शिक्षणाला या देशांत असणारी मागणी झपाट्याने वाढावी, हे तसे तर्कसंगतच आहे. मात्र, उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात खाजगी गुंतवणूकीला चालना देण्याचे धोरण या गटातील अनेक देशांनी अतिशय डोळसपणे अंगिकारले आहे. भारतातील उच्च शिक्षणाचे प्रचलित चित्र या पार्श्वभूमीवर समजावून घ्यावयास हवे. चीनमध्ये या संदर्भात आज जे काही घडते आहे, त्याकडेही सजगपणे बघण्याची गरज आहे. जागतिक दर्जाची विद्यापीठे विकसित करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून देशातील निवडक विद्यापीठांना भरभक्कम अर्थसाहाय्य पुरविण्याचे धोरण आखून चीनची वाटचाल चालू आहे. विद्यापीठीय शिक्षणप्रणालीने आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्याचे सारे प्रयत्न जोमाने जारी ठेवावयास हवेत, असा एक खास संदेश या सर्वेक्षणाने विकसनशील देशांमधील शिक्षणव्यवस्थेस दिला आहे.

*(संदर्भ: अ सर्व्हे ऑफ हायर एज्युकेशन: इकॉनॉमिस्ट - १० सप्टेंबर २००५)*

ECONOMY ★ INDIAN

# बालकामगारांच्या विश्वात

दिवाळी म्हटली की आठवतात फटाके आणि शोभेची दारू. नजर टाकावी तिकडे या चार दिवसांत सर्वत्र असतो तो नजरबंदी करणारा शोभेच्या फटाक्यांचा चकचकाट. आसमंत उजळून टाकणाऱ्या या चकचकाटात दिसत नाहीत ते फक्त हे फटाके घडविणारे हात! कसे दिसावेत? फटाके उडविणाऱ्यांच्या खिजगणतीतही नसतात 'ते' हात. केवळ त्यांच्याच नाही तर देशभरातील कामगारांची शिरगणती करणाऱ्यांच्याही नजरेतून 'ते' हात निसटलेलें असतात, कारण ते हात असतात फारच चिमुकले - बालकामगारांचे. शिवकाशीतील फटाक्यांच्या कारखान्यांत अपघात होऊन फटाके बनविणारे हे चिमुकले हात जायबंदी झाले अथवा प्राणांतिक इजा झाल्यामुळे या हातांचे धनी कायमचे मूक बनले तरच त्यांची 'बातमी' वृत्तपत्रांतून झळकते. अन्यथा या समाजघटकाची 'कामगार' म्हणून रीतसर नोंदही घेतली जात नाही.

केवळ फटाक्यांच्याच नाही तर अर्थव्यवस्थेच्या अनेकविध क्षेत्रांत कार्यरत असणाऱ्या या बालकामगारांच्या विश्वाचे अंतरंग अजून कोणालाही समग्रतेने उलगडलेले नाही. या विश्वाच्या नानाविध पैलूंचा धांडोळा घेणारा अर्थतज्ज्ञ डॉ. सुधा देशपांडे यांचा अलीकडेच प्रसिद्ध झालेला शोधनिबंध महत्त्वाचा ठरतो, तो त्यामुळेच. १९८१ आणि १९९१ या दोन जनगणनांची उपलब्ध आकडेवारी, तसेच राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने १९९३-९४ आणि १९९९-२००० या दोन वर्षांसाठी सर्वेक्षणाद्वारे संकलित केलेली सांख्यिकी यांच्या साहाय्याने बालकामगारांच्या विश्वाचा पट या अभ्यासात उलगडलेला आहे. चौदा वर्षांखालील एखादे बालक जेव्हा 'कामगार' म्हणून गणले जाते तेव्हा त्यास 'बालकामगार' अशी संज्ञा प्राप्त होते. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेच्या मोजदादीनुसार १९८३ साली देशभरात एकूण २ कोटी १५ लाख बालकामगार होते. त्या नंतरच्या १० वर्षांत हे चित्र थोडेसे बदलले. १९९३-९४मध्ये बालकामगारांची ही संख्या घटून १ कोटी ३२ लाखांवर आली. तर, गेल्या सहस्त्रकाच्या अखेरीस, म्हणजे, १९९९-२०००या वर्षात देशभरात एकूण १ कोटी ४लाख बालकामगार होते, असे राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने सादर केलेली आकडेवारी सुचविते.

कुटुंबांची गरिबी, तुलनेने अधिक असणारा जनन दर, गरिबीतील कुटुंबांचे आकारमान आणि अशा कुटुंबांतील बालकामगार यांचे साहचर्य आहे. कोवळ्या बाल्यातच अर्थार्जनाची जबाबदारी खांद्यावर पडणे, ही बाब म्हणजे एका दृष्टीने दुहेरी घाला असतो. पहिली गोष्ट म्हणजे अशी मुले शालेय शिक्षणाला मुकतातच. साहजिकच त्यांच्यामध्ये कोणत्याही प्रकारची 'गुंतवणूक' होत नाही. परिणामी, त्यांचे रूपांतर 'मानवी भांडवला'त घडत नाही. शिक्षणाअभावी अंगभूत क्षमतांचा विकासच न झाल्याने मोठेपणी चांगले वाढीव उत्पन्न मिळविण्याची त्यांची ताकद खुरटलेलीच राहते. म्हणजेच त्यांच्या भविष्यकालीन उन्नतीच्या संधी कोळपून जातात आणि त्यांची गणना 'बालकामगार' म्हणून होत असल्याने लहानपणीही त्यांना मेहेनताना कमीच मिळत असतो.

सर्वाधिक गंभीर बाब म्हणजे, घरगुती स्वरूपाच्या उद्योगांत 'मदतनीस' म्हणून काम करणारी कुटुंबातील लहान मुले, घरकाम करीत असतानाच धाकट्या भावंडांना सांभाळणाऱ्या कुटुंबातील लहान मुली यांचे योगदान आर्थिकदृष्ट्या 'उत्पादक' म्हणून गणले न गेल्याने त्यांच्या 'कामगार' म्हणून असणाऱ्या अस्तित्वाची कोठेही दखलच घेतली जात नाही. त्यामुळे, जनगणना अहवाल असोत वा राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने सर्वेक्षणांद्वारे संकलित केलेली आकडेवारी असो,यच्चयावत बालकामगारांची गणती या मोजदादींमध्ये काटेकोरपणे केली जात असेल, असे ठामपणे म्हणता येत नाही. 'बालकामगार प्रतिबंध तसेच नियंत्रण कायद्या'तील (१९८६) काही तरतुदीही यास कारणभूत असू शकतील. कोणकोणत्या उद्योगांत बालकामगारांस मज्जाव आहे, हे स्पष्ट करणारी एक अनुसूची या कायद्यास जोडलेली आहे. गॅरेजेस्, फौंड्री उद्योग, हातमाग तसेच यंत्रमाग, खाणउद्योग, विड्या वळणे, गालिचे विणणे, सीमेंट उत्पादन, साबण निर्मिती, कापड रंगविणे, कातडी कमावणे, बांधकाम, १९४८च्या कारखाने अधिनियमानुसार 'धोकादायक क्रिया अथवा प्रक्रिया' म्हणून निर्देशित करण्यात आलेली कामे यांसारख्या एकूण ३० उद्योगप्रकारांचा या सूचीत समावेश आहे. मात्र, याच सूचीमधील एखादा व्यवसाय तो व्यावसायिक कुटुंबातील सदस्यांच्या साहाय्याने करीत असेल तर मात्र या कायद्याच्या तरतुदी लागू होत नाहीत. परिणामी, या सूचीतील जे उद्योग घरगुती पातळीवर कौटुंबिक स्वरूपात केले जात असतील अशा उद्योगांत कुटुंबातीलच मुले काम करीत असली तरी मग त्यांची गणना 'बालकामगार' म्हणून होत नाही, ही प्रस्तुत कायद्यातील मोठी उणीवच म्हणावयास हवी.

बालकामगारांच्या या विश्वाला चिकटलेले सामाजिक अस्तरही मोठे विलक्षण आहे. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने १९९३-९४मध्ये केलेल्या पाहणीत बालकामगारांचे सामाजिक स्तरीकरण सादर केले आहे. अनुसूचित जाती तसेच जमातींमधील बालकामगारांचे देशभरातील एकूणच बालकामगारांत असणारे प्रमाण जवळपास ४० टक्के एवढे मोठे असल्याचे ही पाहणी सांगते. यांतील ९० टक्क्यांहूनही अधिक बालकामगार हे ग्रामीण भागांत आहेत. अनुसूचित जाती तसेच जमातींमधील तुलनेने अधिक असणारे गरिबीचे प्रमाण आणि जमीन अथवा अन्य प्रकारच्या मालमत्तेचा या समाजघटकांपाशी असणारा अभाव ध्यानात घेता, याच समाजवर्गांतील बालकामगारांचे प्रमाण एकूणांत अधिक असावे, हे तर्कसंगतच ठरते. परिणामी, लहान वयातच अर्थार्जनासाठी घराबाहेर पडण्यावाचून या घटकांमधील बालकांना पर्यायच राहत नाही. शहरी काय किंवा ग्रामीण काय, अनुसूचित जाती तसेच जमातींमधील मुले व मुली अन्य वर्गीयांपेक्षा आर्थिकदृष्ट्या अधिक सक्रिय असल्या तरी त्यातही पुन्हा या परवशतेचा मुलांपेक्षाही तुलनेने अधिक फटका बसतो तो या समाजघटकांमधील मुलींनाच. ग्रामीण भागातील अनुसूचित जाती तसेच जमातींमधील मुलींचा ‘श्रमशक्ती सहभाग दर ’(वय वर्षे ५ ते १४ या वयोगटातील जेवढी बालके ‘कामगार’ म्हणून गणली जातात, तसेच जी बालके रोजगाराच्या शोधात आहेत अशांची या वयोगटातील एकूण बालकांमधील टक्केवारी) हा अन्य समाजघटकांमधील मुले व मुलीच केवळ नव्हेत तर, अनुसूचित जाती-जमातींमधील मुलांपेक्षाही अधिक असल्याचे ही पाहणी सांगते.

**ना शाळेत ना कामावर**

बालपणीच रोजंदारीवर जावे लागल्याने बालके शालेय शिक्षणाला मुकतात, ही झाली या चित्राची केवळ एक बाजू. १९९१च्या जनगणनेने बालकांच्या विश्वाचा आणखी एक जो पैलू प्रकाशात आणला आहे, तो तर अधिकच चिंतनीय (आणि चिंताजनकही!) आहे. देशभरात अशी अनेक बालके आहेत की जी ना शाळेत सापडतात ना कामावर. वय वर्षे ५ ते ९ या वयोगटातील अशा मुलांचे व मुलींचे १९९१ साली एकूणांतील प्रमाण अनुक्रमे ६१ टक्के आणि ६९ टक्के इतके होते. वय वर्षे १० ते १४ या वयोगटात या दोन्ही प्रमाणांत लक्षणीय घट दिसते - मुलेः २२ टक्के आणि मुलीः ४५ टक्के. मात्र, एवढ्या मोठ्या संख्येने बालके ना शाळेत सापडतात ना ती कोणत्याही प्रकारचे काम करताना आढळतात, ही खरोखरच चक्रावून टाकणारी बाब आहे. त्यातही पुन्हा डोळ्यांत भरणारी गोष्ट म्हणजे या उभय वयोगटांत मुलींचे

प्रमाण हे मुलांपेक्षा अधिकच आहे. ना शाळेच्या वर्गात ना कामावर अशा या मुली मग असतात तरी कोठे ? या संदर्भातील एक अनुमान असे आहे की या सगळ्या मुलींचे घरकामातील कष्ट हे 'अदृश्य'च राहतात! अशा मुलींचा घरकामातील सहभाग हा आर्थिकदृष्ट्या उत्पादक 'काम' या सदरात गणलाच जात नाही. घरकामाची जबाबदारी अंगावर असल्याने अशा मुलींची ना वर्गात हजेरी लागते, आणि घरातील रांधापाणी, लहान भावंडांचा सांभाळ, सरपण अथवा पाणी आणणे यांसारख्या 'घरकामा'ला 'काम' या संज्ञेचा दर्जा कायद्यानेच दिलेला नसल्याने ना 'कामगार'म्हणून त्यांची रीतसर नोंद केली जाते. मुलींच्या संदर्भातील विषमतेचे हे जणू आणखी एक परिमाणच. शैक्षणिक सुविधांचा अपुरा पुरवठा, व्यवसाय शिक्षणाच्या संधींचा तुटवडा, शालेय शिक्षणाबाबतचे पालकांमधील औदासिन्य यांसारख्या बाबी या वास्तवास कारणीभूत ठरतात.परिणामी, अशी 'कामे' आणि त्यांत गुंतलेले असे हात हे 'अदृश्य'च राहतात.

अर्थार्जनाची जबाबदारी बालपणीच अंगावर पडल्याने रोजंदारीच्या शोधात निघालेल्या या बालकामगारांना रोजीरोटी मिळते तरी कोठे, या संदर्भात दशवार्षिक जनगणना तसेच राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने संकलित केलेली आकडेवारीही अभ्यासनीय आहे. १९९१ च्या जनगणनेनुसार, ग्रामीण भागांपुरते बोलावयाचे तर जवळपास ८६-८७ टक्के मुला-मुलींना रोजगार मिळतो तो शेतीमध्ये. त्यातही पुन्हा, शेतमजुरी करणाऱ्यांमध्ये मुलींचे प्रमाण हे मुलांपेक्षा अधिक आहे. सर्वसाधारणपणे तीन ते पाच टक्के मुले-मुली पशुपालनामध्ये गुंतलेली आढळतात. उरलेल्या १० टक्क्यांत घरगुती तसेच अन्य उद्योग आणि बांधकाम, व्यापार, वाहतूक यासारख्या सेवाउद्योगांचा हिस्सा आहे निम्मानिम्मा. याचाच अर्थ हा की ग्रामीण भारतात शेती तसेच शेतीसंलग्न व्यवसाय हाच बालकामगारांसाठी रोजगाराचा मुख्य पर्याय ठरतो. शहरी भागांत मात्र, अपेक्षेप्रमाणेच, चित्र वेगळे दिसते. एकूणांतील जवळपास एक तृतीयांश बालकामगार हे शहरांतील घरगुती तसेच अन्य उद्योगांत सामावलेले दिसतात (मुलेः ३४.७ टक्के आणि मुलीः ३६.३ टक्के). मुली, तसेच मुलांच्याबाबतीत शहरी भागांतील रोजगारसंधींच्या संदर्भात, उद्योगांखालोखाल, व्यापार तसेच सेवाक्षेत्रांचे माहात्म्य अधिक दिसते.

घरगुती उद्योगांव्यतिरिक्त शहरांत जे अन्य उद्योग आपला पसारा थाटतात त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांना रोजीरोटी उपलब्ध होते, ही खरे पाहता चिंतेचीच बाब म्हणावयास हवी. कारण अशा ठिकाणी काम करीत असताना मुलांच्या आयुष्याची कधीही भरून न येणारी अशी जी हानी होते तिच्याकडे मात्र फारसे

कोणाचेच लक्ष जात नाही. फटाके, काच तसेच काचेच्या वस्तू, बांगड्या, खनिज पदार्थांचे उत्खनन, रसायने व रासायनिक उद्योग, विड्या तयार करणे, गालिचे तयार करण्याचा व्यवसाय, मोत्यांना चकाकी आणणे, काडेपेट्यांची निर्मिती, कुलुपे तयार करणे, भंगाराचे संकलन व विक्री यांसारख्या उद्योगांत काम करण्याने मुलांच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम होऊन त्यापायी त्यांची कायमस्वरूपी हानी झाल्याची अनेक उदाहरणे सापडतात. लहान मुले ज्या कारखान्यांमधून कामे करतात ते कारखाने हे बव्हंशी छोटे कारखाने, लघुउद्योग असतात. तेथील वातावरण हे मुलांच्याच केवळ नव्हे तर एकंदरच कामगारांच्या प्रकृतीस हितावह नसण्याचीच शक्यता अधिक. अशा अनारोग्यपूर्ण वातावरणात काम केल्याने बालकामगारांच्या काय किंवा एकूणच कामगारांच्या प्रकृतीवर होणाऱ्या प्रतिकूल परिणामांबाबत मात्र जनगणना अहवालांत माहिती मिळत नाही.

**कायमस्वरूपी हानी**

लहानमोठ्या उद्योगांतील बालकामगारांचा सहभाग ही स्पृहणीय बाब खचितच नाही. परंतु, त्याही पुढे जाऊन, 'धोकादायक उद्योग' या गटात अंतर्भाव होणाऱ्या उद्योगांत मुलांनी अर्थार्जन करणे, ही तर अधिकच घातक गोष्ट मानावयास हवी. उद्योगांच्या या गटात रोजीरोटी कमाविणाऱ्या बालकांसंबंधीची आकडेवारी राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने १९९३-९४मध्ये केलेल्या पाहणीत पाहावयास मिळते. 'धोकादायक उद्योग' म्हणून ज्यांची गणना करता येईल, अशा उद्योगांत काम करणाऱ्या बालकामगारांची ग्रामीण भागांसाठी असणारी टक्केवारी होती सात, तर शहरी भागांत अशा धोकादायक उद्योगांत कामे करणाऱ्या बालकामगारांचे एकूणांत असणारे प्रमाण होते जवळपास २४ टक्के. कापड रंगविणे (डाइंग) आणि विणकाम तसेच विड्या वळणे, या दोन उद्योगांचा समावेश 'सर्वाधिक धोकादायक उद्योग' या वर्गात करावा लागेल. प्रकृतीस अत्यंत प्रतिकूल अशा वातावरणात प्रदीर्घ काळ काम केल्याने अशा बालकामगारांची होणारी कायमस्वरूपी हानी ही केवळ शारीरिकच नव्हे तर मानसिक स्वरूपाचीही असते. सगळ्यात गंभीर बाब म्हणजे, प्रतिकूल वातावरणात वर्षानुवर्षे काम केल्याने अशा मुलामुलींची जी कधीही भरून न येणारी अशी शारीरिक तसेच मानसिक हानी होते त्यापायी मोठेपणीही एखादे काम पूर्ण उत्पादक क्षमतेने करण्यास हे बालकामगार असमर्थ बनतात. परंतु, या संदर्भातील सांख्यिकी मिळणे मात्र दुरापास्त असते.

एकूण श्रमशक्तीमधील बालकामगारांचे लक्षणीय प्रमाण, हे एक सामाजिक वैगुण्य आहे. यावर उतारा शोधावयाचा असेल तर, कोवळ्या बाल्यातच श्रमांच्या

बाजारपेठेचा पंथ धरण्याची हतबलता मुलांवर आणणाऱ्या घटकांचा धांडोळा घेणे आवश्यक ठरते. राष्ट्रीय नमुना पाहणी संघटनेने १९९३-९४ तसेच १९९९-२००० या दोन वर्षांत केलेल्या सर्वेक्षणांद्वारे संकलित केलेली आकडेवारी वापरून देशभरातील १६ मोठ्या राज्यांसाठी डॉ. देशपांडे यांनी केलेले विश्लेषण, या संदर्भातील धोरणात्मक तरतूदींची दिशा स्पष्ट करणारे असेच आहे. साक्षरतेचे पुरुषांमधील प्रमाण, राज्यांचे दरडोई उत्पादन, दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येचे राज्यवार प्रमाण, प्रौढ महिला तसेच पुरुषांचा श्रमशक्ती सहभाग दर, एकूण श्रमिकांमधील शेतमजुरांचे प्रमाण अशा नानाविध घटकांचा, १० वर्षे ते १४ वर्षे या वयोगटातील मुलामुलींच्या श्रमशक्ती सहभाग दरावर काय व कसा परिणाम होतो, याचा हा अभ्यास उद्‌बोधक असा आहे.

साक्षरतेच्या पुरुषांमधील प्रमाणाचा बालकामगारांच्या प्रमाणावर थेट परिणाम होतो, असा या विश्लेषणाचा एक निष्कर्ष आहे. समाजातील पुरुषप्रधान कुटुंबव्यवस्थेत घरातील कर्ता पुरुषच बहुतेक सारे निर्णय घेत असतो. अशा परिस्थितीत, शिक्षणासंबंधीचे त्या पुरुषाचे विचार काय आहेत, शिक्षणाचे जीवनातील महत्त्व त्याला कितपत उमगले आहे, यांसारख्या बाबी, घरातील मुलामुलींच्या शिक्षणाबाबत तो कर्ता पुरुष कितपत सतर्क राहतो या संदर्भात महत्त्वाच्या ठरतात. ज्या राज्यांत साक्षरतेचे प्रमाण पुरुषांमध्ये कमी दिसते तिथे त्यानुसार १० ते १४ वर्षे वयोगटातील मुलामुलींचे श्रमशक्ती सहभाग दर अधिक असल्याचे विश्लेषणावरून दिसून येते. तसेच, श्रमिकांना असणारी एकूणच मागणी वाढली की बालकांच्या श्रमशक्ती सहभाग दरातही वाढ होताना दिसते, असे हा अभ्यास सांगतो.

लहान मुलामुलींचा श्रमशक्ती सहभाग दर आणि गरिबी यांच्यादरम्यानचे नाते मात्र सर्व काळ आणि सर्व ठिकाणी एकसारखेच असल्याचे दिसत नाही, असे एक मोठे वैशिष्ट्यपूर्ण निरीक्षण या अभ्यासातून पुढे येते. दरडोई उत्पन्नात वाढ होणे, दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत घट होणे ही गरिबीच्या प्रमाणात कपात होण्याची लक्षणे. अशा वातावरणात १० वर्षे ते १४ वर्षे या वयोगटातील मुलामुलींच्या श्रमशक्ती सहभागिता दरातही घट अपेक्षित आहे. या उलट, सर्वसाधारणपणे गरिबीच्या प्रमाणात अथवा तीव्रतेत वाढ झाली की अशा कठीण बनलेल्या गरिबीशी दोन हात करण्यासाठी घरातील मुला-बाळांसकट सर्वांनीच रोजगाराच्या वाटा धुंडाळण्यास बाहेर पडावे, हे तर्कसंगतच आहे. मात्र, असा अनुभव ग्रामीण भागांतील मुलींच्याबाबतीत येत नाही.

ग्रामीण भागातील एकत्र कुटुंब पद्धतीमुळे कुटुंबांचा आकार मोठा असतो. अशा परिस्थितीत, गरिबी अधिक तीव्र बनली की किमान गरजांची तरी पूर्तता व्हावी यासाठी घरातील सगळेच प्रौढ स्त्री-पुरुष मिळेल त्या रोजगाराच्या शोधात बाहेर पडतात. अशा वेळी, घरातील मुलींना मात्र, रोजंदारीवर पाठविण्याऐवजी घरकाम करण्यासाठी घरीच बसविले जाते. परिणामी, मुलींच्या श्रमशक्ती सहभाग दरात मग घट आढळून येते.

नेमका हाच प्रकार दिसून येतो तो शहरी भागांतील मुलामुलींच्याबाबतीत. मात्र त्यामागील कार्यकारणभाव हा वेगळा आहे. शालेय शिक्षणाच्या शहरांमधील तुलनेने अधिक असणाऱ्या सुविधा, शिक्षणाचे शहरवासीयांना पटलेले माहात्म्य आणि मुख्य म्हणजे शहरांतील असंघटित क्षेत्रांत उपलब्ध होणाऱ्या रोजगारांच्या अपरिमित संधी यांचा एकत्रित परिणाम होऊन, गरिबीचे प्रमाण अथवा तीव्रता वाढली तरी मुलांना पूर्णवेळ रोजगारावर धाडण्याऐवजी त्यांस अर्धवेळ का होईना परंतु शाळेत पाठविण्याकडे पालकांची प्रवृत्ती असल्याचे ही सर्वेक्षणे सांगतात. परिणामी, अशा मुलांची गणना ही 'कामगार' या गटात होत नाही आणि त्यांचा श्रमशक्ती सहभाग दर हा घटलेला दिसतो. शहरांमधील विस्तारलेल्या रोजगारसंधींपायी अनेक प्रकारची कामे ही 'पीस रेट' पद्धतीने घरी आणून करणे आता शक्य झाले आहे. परिणामी, घरातील प्रौढ महिलांचा श्रमशक्ती सहभाग दर अलीकडील काळात वाढलेला दिसतो. त्यामुळे घरातील लहान मुलींना आता अर्थार्जनासाठी बाहेर पाठविण्याऐवजी घरातील कामे त्यांच्याकडे सोपविण्याबरोबरच त्यांनाही अर्धवेळ का होईना परंतु शाळेत पाठविण्याकडे पालकांचा कल अलीकडे वाढत असल्याचे ही सर्वेक्षणे सांगतात. त्यामुळे मुलींचाही श्रमशक्ती सहभाग दर घटलेला दिसतो. शाळांमधील हजेरी प्रमाणातही या बदलत्या मानसिकतेचे प्रतिबिंब उमटलेले आढळते, याचा पुरावाही संबंधित आकडेवारीवरून मिळतो. गेल्या सुमारे दशक-दीड दशकभराच्या काळात देशातील बालकामगारांच्या संख्येत घट झाल्याचे आढळून येत असले, तरी त्यामुळे बालमजुरीविरुद्धचा लढा सौम्य बनवून मात्र चालणार नाही. कारण, देशभरात सुमार एक कोटी मुले मजुरी करण्यास जुंपलेली आहेत, हे चित्र नक्कीच भूषणावह नाही....आणि दुर्लक्ष करण्याइतपत 'एक कोटी' हा आकडाही नगण्य नाही !

*(संदर्भ: डॉ. सुधा देशपांडे यांचा शोधनिबंध : 'जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' - खंड १६, अंक २ व ३)*

# व्हिडिओ गेम्सचा भूलभुलैय्या

सध्याचे शतक हे विज्ञानाचे, ज्ञानाचे, माहिती-तंत्रज्ञानाचे, जागतिकीकरणाचे, खुल्या व्यापाराचे आहे, तसेच ते व्हिडिओ गेम्सचेही आहे असे म्हटले तर ती अतिशयोक्ती ठरणार नाही. अर्थात, सर्वच देशांमधील विविध समाजांतील सर्व नागरिकांपर्यंत हे लोण पोचले आहे असे नाही; पण, अनेक देशांमधील उच्चभ्रू, उच्चमध्यमवर्गीय व काही प्रमाणात मध्यमवर्गीयांना व्हिडिओ गेम्सने वेड लावले आहे ही वस्तुस्थिती नजरेआड करून चालणार नाही. विशेषतः अमेरिकेत याचे वेड बरेच असून, यात चाळीशीच्या आतील नागरिकांचे प्रमाण जास्त आहे. व्हिडिओ गेम्स हे प्रकरण नक्की आहे तरी काय? चित्रपट, संगीत याला समांतर असे करमणुकीचे माध्यम की एक महत्त्वपूर्ण शैक्षणिक साधन, की खेळताखेळता मुलांना हिंसा शिकविणारे एक साधन ? गंमत अशी की, व्हिडिओ गेम्स हे सध्या या तीनही प्रकारात मोडले जात आहेत. गेल्या काही वर्षांत व्हिडिओ गेम्स हे जास्त प्रमाणात चित्रपटांसारखे बनविले जात आहेत. त्यात प्रसिद्ध नट-नट्यांची नावे आहेत; संगीत आहे; अतिशय गुंतागुंतीचे व रोमहर्षक कथानकही आहे आणि प्रत्यक्षात घडलेला वा घडत असलेला हिंसाचारही आहे. तसेच यात M म्हणजे 'मॅच्युअर' - सतरा वर्षांवरील नागरिकांसाठी आणि A.O. - 'ॲडल्ट्स् ओन्ली' - अठरा वर्षांवरील नागरिकांसाठी अशी वर्गवारीही आहे.

साधारणपणे, गेल्या पाच वर्षांपासून व्हिडिओ गेम्स हे सार्वजनिक मनोरंजनाचे एक मोठे साधन बनले असून तो एक मोठा उद्योग म्हणूनही स्थिरावला आहे. मायक्रोसॉफ्ट, सोनी आणि निंटेन्डो या मोठ्या कंपन्या सतत नवनवीन व्हिडिओ गेम्स बाजारात आणत आहेत आणि दरवेळीस त्यावर नव्याने वाद-चर्चा होत आहे. यासंदर्भात अलीकडची एक घटना बोलकी आहे. 'ग्रँड थेफ्ट ऑटो: सॅन अन्ड्रिज' या नावाच्या एका नव्या व्हिडिओ गेमवर अमेरिकेत मोठी चर्चा झडली. यातील काही दृष्ये फक्त प्रौढ व्यक्तींसाठी होती आणि ती नेहमीच्या खेळात दिसून येत नव्हती, मात्र इंटरनेटच्या मदतीने ती सहज उपलब्ध होऊ शकत होती. अमेरिकेचे माजी अध्यक्ष बिल क्लिंटन यांच्या पत्नी सिनेटर हिलरी क्लिंटन व इतर काहींनी यासंदर्भात आवाज उठविला. यानंतर त्याच्या वर्गवारीत बदल होऊन ती M वरून A.O. अशी करण्यात आली.

या घटनेमुळे व्हिडिओ गेम्सपायी होणाऱ्या विविध परिणामांचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. यासंदर्भात पुढील तीन मुद्दे विचारात घ्यावेत, असेही सुचविण्यात आले आहे. एक, व्हिडिओ गेम्स हे वाईट नाहीत, त्याचा वापर करणाऱ्या पिढीवर त्यासंदर्भातील मत अवलंबून असते. कारण जुन्या पिढीतील जे नागरिक आयुष्यात कधीच व्हिडिओ गेम्स खेळलेले नाहीत त्यांना ते हिंसक वाटतात; जे नेहमी खेळणारे असतात ते फक्त मनोरंजनाचे एक माध्यम म्हणून याकडे बघत असतात. हा मुद्दा पुढे रेटण्यात विविध कंपन्या आघाडीवर आहेत. दुसरीकडे, व्हिडिओ गेम्समुळे हिंसक कृत्ये करण्यास प्रेरित झालेल्या व्यक्तीची बातमी सतत कुठे ना कुठे प्रसिद्ध होत असते. तरीदेखील यासंबंधीचे अभ्यास याची स्पष्टता करीत नाहीत. त्यामुळे बहुतेकांच्या मनात हा संभ्रम कायम राहतो. व्हिडिओ गेम्समुळे अमेरिकेतील हिंसाचार वाढले आहेत, असे ठामपणे म्हणता येत नाही.

तिसरा मुद्दा आहे तो शिक्षणाचा. व्हिडिओ गेम्सच्या समर्थकांच्या मते हे गेम्स बरेच गुंतागुंतीचे असतात. त्यात कोडी सोडवावी लागतात, खेळताना आलेल्या अनुभवांच्या आधारे सर्वंकष विचार करून अनेक निर्णय घ्यावे लागतात. उदाहरणार्थ, 'सिम सिटी' किंवा 'रोलरकोस्टर टायकून' या खेळांमध्ये अर्थशास्त्रविषयक प्रतिमाने आहेत. 'सिम सिटी'मध्ये खेळाडूला शहराचे महापौर बनून आर्थिक निर्णय घ्यावे लागतात. विमानोड्डाणाच्या आधी विमानचालकाला संगणकीय प्रतिकृतीवरून प्रशिक्षण तर बरेच आधीपासून देण्यात येत होते. रणांगणावर लढणारे सैनिक आणि शस्त्रक्रिया करणारे शल्यचिकित्सक हेदेखील याच माध्यमातून शिकत आहेत. अलीकडे तर ब्रिटनमधील एका शिक्षकाने प्राथमिक शाळेतील मुलांच्या भाषिक कौशल्यात वाढ करण्यासाठी संगणकीय व्हिडिओ गेम्सचा उपयोग केला. शासनाच्या शिक्षणमंडळाने त्याला पुरस्कार देऊन गौरविले आहे. अनेक कंपन्यांमध्ये व्यवस्थापनाच्या क्षेत्रात व्हिडिओ गेम्सचा उपयोग करून कर्मचाऱ्यांची विविध प्रकारची कौशल्ये वाढविली जात आहेत. अनेक वकीलदेखील कोर्टाची पायरी चढण्याआधीचे धडे या खेळांमधून आपल्या पक्षकाराला/अशीलाला देत आहेत.

असे असले तरी काहींच्या मते, व्हिडिओ गेम्स हे पुस्तके, दूरदर्शन, चित्रपट या माध्यमांसारखेच आहेत. त्यांचा उपयोग चांगला व वाईट कसाही करता येईल. तो करणाऱ्याच्या विवेकबुद्धीवर (?) अवलंबून आहे.

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट - ऑगस्ट २००५)*

# म्हणोनि कथिली ग्रामगीता

*गावाची करावी आदर्श व्यवस्था/ म्हणोनि कथिली ग्रामगीता/*
*ग्रामापासोनि पुढे वाढता/ विश्वव्यापी व्हावे// ३८.४९*
*जेथे गावाचाच न कळे धर्म/ तेथे विश्वधर्माचे कैचे वर्म ?*
*हेचि कळावया साधन सुगम/ धरिले गावाचे// ३८.५०*
*मनुष्य ग्रामाचा संरक्षक/ ग्राम देशासि पोषक /*
*देश विश्वाचा घटक/ ऐसे व्हावे यथार्थ// ३८.५१*

माहिती तंत्रज्ञान आणि माहितीजाल या आजच्या जगातील दोन किमयागारांनी अंतराचा अंत घडवून आणला आहे. त्यामुळे प्रचंड विस्तार असल्याने अफाट भासणारे हे जग एकदम जवळ आले आहे. इतके की या विश्वाचा उल्लेखही आता 'ग्लोबल व्हिलेज' असा केला जातो. आज प्रत्येकच व्यक्ती 'वैश्विक नागरिक बनली आहे. या वातावरणात 'आपण' आणि 'विश्व' यांच्या नात्याची नेमकी मांडणी केल्याशिवाय त्या वैश्विक खेड्याचा विश्वधर्म आकळणार नाही, असाच 'ग्रामगीता' कार तुकडोजींचा सांगावा आहे. 'काल'चे 'आज'साठी या सदराच्या माध्यमातून, स्थलकालाची बंधने गळून पडलेल्या विचारांच्या विश्वातील यापुढची वाटचाल आपण करणार आहोत ती तुकडोजींच्या 'ग्रामगीते'चे पाथेय सोबतीस घेऊन. गावाचा सर्वांगीण विकास आणि चहूं अंगांनी बहरलेले समृद्ध ग्रामजीवन, हीच देशाच्या प्रगतीची आद्य अट आहे, ही तुकडोजींची जीवनश्रद्धा होती. त्यामुळे 'ग्रामोद्धार' हाच त्यांनी आपला जीवनधर्म मानला आणि आधुनिक स्वतंत्र भारतातील ग्रामीण जीवन कसे असावे, याची आपल्या मनीमानसीची रूपरेषा त्यांनी 'ग्रामगीते'च्या ४१ अध्यायांतील ४ हजार ६७५ ओव्यांच्या रूपाने अक्षरबद्ध केली. लोकसहभाग

हा लोकशाही राज्यव्यवस्थेचा गाभा आहे. गावाचा विकास लोकशाही पद्धतीने घडवून आणायचा असेल तर गावाच्या घराघरातील व्यक्ती कार्यतत्पर बनावयास हवी. अशा कार्यतत्पर ग्रामस्थांचे संघटन हवे. आपल्या गावाशी असलेल्या आपल्या जैविक नात्याची खूण पटल्याखेरीज आपले गाव आणि आपला देश यांच्या अनुबंधाची जाण येणार नाही. ही जाण येत नाही तोवर आपला देश आणि जवळ आलेले जग यांच्या संबंधांची वीण कळणार नाही. आणि ती वीण कळत नाही तोवर या 'ग्लोबल व्हिलेज'चा घटक म्हणून जगताना जो विश्वधर्म प्रत्येकानेच पाळावयास हवा त्याचे वर्म आकळणार नाही, अशी तुकडोजींची धारणा आहे. हे वर्म उमगत नाही, तेथवर ग्रामविकासासाठी कटिबद्ध होण्याची कर्तव्यतत्परता अंगी बाणणार नाही. स्वतःच्या ठायी सारे जग पाहणे आणि आपल्या संवेदनेची कक्षा विश्वव्यापक बनवून आपणच जगदाकार बनणे, यालाच तर विश्वधर्माचे पालन म्हणावयाचे.

पूजितसे मी कवणाला ? - तर मी पूजीं अपुल्याला,
आपल्यामध्यें विश्व पाहुनी पूजीं मी विश्वाला;

हे केशवसुतांचे उद्‌गार तरी यापेक्षा काय वेगळे सांगतात ? केशवसुतांचा आणि तुकडोजींचा स्वर परस्परांशी जुळतो तो असा. हा योगायोग मोठा विलक्षण आहे. ७ नोव्हेंबर २००५ रोजी केशवसुतांची स्मृतिशताब्दी झाली, तर १० नोव्हेंबर २००५ हा तुकडोजींचा ३८ वा स्मृतिदिन होता. तुकडोजी महाराजांची 'ग्रामगीता' १९५५ सालच्या सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यातच प्रथम प्रकाशित झाली. म्हणजे, सध्याचे वर्ष हे 'ग्रामगीते'चे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. आदर्श ग्रामजीवन कसे असावे, याचे चित्र रेखाटणारी 'ग्रामगीता' हा जणू एक आरसा आहे. आपले आजचे ग्रामजीवन नेमके कसे आहे आणि तुकडोजींनी रेखाटलेल्या चित्राशी त्याचा सांधा कोठे नि कितपत जुळतो हे पाहण्यासाठी या आरशात डोकावून पाहणे, हें उचित नाही का ? 'काल'चे 'आज'साठीचा सारा खटाटोप त्यासाठीच तर आहे ! ✿✿





## <u>अर्थबोधपत्रिका वर्गणीदारांसाठी विशेष योजना</u>

(१५ ऑक्टोबर २००४ पासून)

| | |
|---|---|
| **वार्षिक वर्गणी** | **फक्त १०० / - रुपये** |
| **द्वैवार्षिक वर्गणी** | **फक्त १८० / - रुपये** |
| **त्रैवार्षिक वर्गणी** | **फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट** |
| **पंचवार्षिक वर्गणी** | **फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट** |

**पुस्तिका -** (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न, लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत तीस रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (इंग्रजी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ (किंमत तीस रुपये) (३) सक्तीचे प्राथमिक शिक्षण, (मराठी पुस्तिका) लेखक - जयकुमार अनगोळ, अनुवाद - प्रा. रमेश पानसे (किंमत तीस रुपये) (४) शोध घेते ते शिक्षण, लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत - पन्नास रुपये) (५) अर्थबोधपत्रिकेचा मेंदूसंशोधन विशेषांक (फेब्रुवारी - मार्च २००५) - (किंमत चाळीस रुपये)

# ग्रंथालयातील नवी पुस्तके

The Food Security in Asian Countries in the context of Millennium Goals - Edited by Vijay S. Vyas; Publishers: Academaic Foundation, New Delhi; pp- 172; Price Rs : 495/-

राष्ट्रीय तसेच जागतिक स्तरावरच्या भूक व अन्न-सुरक्षिततेच्या पातळ्या कमी करण्याची प्रतिज्ञा, आशियातील जवळजवळ सर्वच राष्ट्रांनी केली आहे. १९९६ मध्ये रोम येथे झालेल्या जागतिक अन्न शिखर परिषदेत या दिशेने प्रत्यक्षात कशी पाऊले टाकायची, हे ठरविण्यात आले. त्यानंतर २००० साली न्यूयॉर्क येथे भरलेल्या सहस्रक शिखर परिषदेतही याचा पुनरुच्चार करण्यात आला. मानवी विकासाशी निगडित असणाऱ्या विविध क्षेत्रांमधल्या आठ उद्दिष्टांचा व लक्ष्यांचा समावेश असणारी 'सहस्रक घोषणा'ही (Millennium Decleration) याच परिषदेत करण्यात आली होती. सहस्रक उद्दिष्टांच्या संदर्भात, आशियाई राष्ट्रांमध्ये अन्न-सुरक्षा प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने जे काही प्रयत्न झाले, त्यांच्या फलश्रुतीचे परीक्षण करण्याच्या हेतूने प्रस्तुत पुस्तकाचे संपादन करण्यात आले आहे. अर्थात, अन्न-सुरक्षा निश्चित करणारे घटक, जागतिक पातळीपेक्षा, राष्ट्रीय पातळीवरच अधिक चांगले समजू शकतात, या गृहीतानुसार या पुस्तकात काही राष्ट्रांचे प्रत्यक्ष केलेले अभ्यास अन्तर्भूत केले आहेतः कंबोडिया व नेपाळ ही अत्यल्प विकसित राष्ट्रे; अर्थविकासाच्या आपल्या प्रारुपात वेगाने बदल घडवून आणणारी व मध्यम पातळीचे उत्पन्न असणारी इंडोनेशिया व थायलंड ही राष्ट्रे आणि भौगोलिकदृष्ट्या मोठा व वेगाने विकसित होणारा भारत - अशा पाच राष्ट्रांचा अभ्यास यात आहे. खरे तर, समाज, अर्थव्यवस्था, राजकीय परिस्थिती अशा बाबतींमध्ये या पाचही राष्ट्रांमध्ये खूप फरक आहे. तसेच, आपापल्या उद्दिष्टांचा पाठपुरावा करताना त्यांना आलेले अनुभव आणि अन्न-सुरक्षा प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी उपयोजिलेली व्यूहरचना यांच्यातला फरकही मोठा आहे. पण तरीही त्यांच्या व्यापक उपयोजिता असणाऱ्या उपक्रमांवरून जे मौलिक अनुभव मिळाले, त्यांचा अंतर्भाव या पुस्तकात आहे. अन्न-सुरक्षेच्या संदर्भातील अडचणी आणि संधी निश्चित झाल्यामुळे, प्रादेशिक जागरूकता तर निर्माण होईलच, पण या संबंधीच्या धोरणाची संभाव्य दिशाही स्पष्ट होऊ शकेल, असा विश्वास पुस्तकात व्यक्त झाला आहे. केवळ भूक-निर्मूलन करण्यापेक्षा, प्रत्येक नागरिकाला आरोग्यपूर्ण व उत्पादक आयुष्य जगता येईल, असे प्रयत्न आवश्यक आहेत आणि या राष्ट्रांना हे शक्य आहे, असा आशावाद त्यात प्रकट झाला आहे. ■■

RNI, Regn.No. MAHMAR/2002/9806
Declaration Ref. P.H.M./S.R./180/VIII/2005
Postal Regn.No.PR/RNP/PNW/M/231/2003-2006
L.W.P. LICENCE NO. L-502

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ■'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ■भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ■अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग - व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयांचे ज्ञान व माहिती देणे. ■इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करून प्रकाशित करणे.

**उपक्रम** ■संस्थेतर्फे १९८९ सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक('जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी') चालवले जाते. ■संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ■अलीकडे, संस्थेतर्फे सर्वसामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

●अजित कर्णिक ●विकास चित्रे ●कुमुदिनी दांडेकर
●ललित देशपांडे ●द.ना. धनागरे ●आनंद नाडकर्णी ●रमेश पानसे
●मनोहर भिडे ●नीळकंठ रथ ●व्ही.एम्.राव ●ए.वैद्यनाथन
●सत्यरंजन साठे ●रामदास होनावर ●योगेंद्र यादव

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : अभय टिळक**